दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –२९ | रविवार, दि.०५ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-29 | Sunday, Dt.05 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# महाराष्ट्र शासन आणि प्रशासनाचा अप्रतिम निर्णय

## प्रलंबित अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील जिल्ह्यातील १०८ उमेदवारांना दिली शासकीय सेवेत थेट नियुक्ती



### १०८ कुटुंब बीड जिल्ह्यात स्थिरावले..!

अनुकंपा तत्वावर आणि एमपीएससी अंतर्गत पात्र असलेल्या उमेदवारांपैकी १०८ पात्र लाभार्थ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे. जवळपास १९१ पात्र असलेल्या लाभार्थ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात येणार आहे.पहिल्या टप्प्यात १०८ लाभार्थ्यांना शासन सेवेत सामावून घेत राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. राज्यभरात या भरती प्रक्रियेमुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सरकारच्या प्रती संवेदनशीलता निर्माण झाली आहे हे नाकारून चालणार नाही.

### नैराश्य असलेल्या चेहऱ्यावर फुलले आशेचे हसू

तांत्रिक अडचणीमुळे मागील अनेक वर्षापासून अनुकंपा तत्त्वावरील रखडलेली भरती प्रक्रिया आणि एमपीएससी सारखे परीक्षा उत्तीर्ण होऊन देखील जॉइनिंगच्या प्रतीक्षेत दोन वर्षापासून रखडलेले गुणवंत बेचैन होते. ते नैराशेच्या खाईत गाडले जात होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसाच्या अभिनव संकल्पनेमध्ये या नैराश्यग्रस्तांना शासकीय सेवेत संधी देऊन त्यांच्या चेहऱ्यावर नव्या चैतन्याचे हसू निर्माण केले आहे. त्यांच्या आयुष्यामध्ये एक नवीन उमेद निर्माण केली आहे हे नक्की.

**प्रतिनिधी @ बीड**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत अनुकंपा तत्वावरील गट–क संवर्गातील उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक–टंकलेखक संवर्गातील उमेदवारांना जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या साक्षीने आज नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एम.एस.साळवे, जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रवी तोंडे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण उखळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शासकीय सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. परंतू, तांत्रिक कारणे किंवा काही प्रशासकीय कारणास्तव या नियुक्त्या रखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागत होती. अशा या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून नवीन अनुकंपा धोरण तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून आज अनुकंपा प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवारांना एकाच वेळी नियुक्ती पत्रे देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेण्यात आलेल्या लिपिक–टंकलेखक श्रेणीतील उमेदवारांना देखील नियुक्तीपत्रे देण्यात आली.आज आयोजित या मेळाव्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवेतून निवड झालेले लिपिक–टंकलेखक संवर्गातील ६४ उमेदवार तसेच अनुकंपा तत्वावरील गट–क संवर्गातील ३६ आणि गट–ड संवर्गातील ०८ उमेदवार अशा एकूण १०८ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले.जिल्हास्तरीय या रोजगार मेळाव्यास संबंधित उमेदवार

# स्व.काकूंचे जीवन परोपकारासाठीच

## रामायणाचार्य रामराव ढोक महाराज





**प्रतिनिधी @ बीड**

जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून स्व.काकूंकडे पाहिले जाते त्यांना अभिवादन करण्यासाठी एवढा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहतो हेच काकूंच्या कार्याची पावती आहे. अशा लोकनेत्या स्व.काकूंचा कधीही विसर पडू नये असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. ढोक महाराज यांनी केले तर स्व.काकूंचे आम्ही वारसदार असल्याचा अभिमान वाटतो, काकूंसारख्या कर्तबगार महिलेने शून्यातून विश्व निर्माण केल्याची प्रेरणा घेण्यासारखी असल्याचे

### आम्ही स्व.काकूंचे वारसदार असल्याचा अभिमान वाटतो – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शनिवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी माजी खासदार स्व.केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचवेळी प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या कीर्तनाचेही आयोजन

(उर्वरीत पान २ वर)

# कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन आवश्यक – प्रा. सुरेश नवले





**प्रतिनिधी @ बीड**

तालुक्यातील मौजे कपिलधारवाडी गावावर भूगर्भीय हालचालींचे संकट ओढवले असून, गावातील रस्ते, घरांच्या भिंतींना मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. अनेक घरांना या भेगांमुळे तडे जाऊन वास्तव्य करणे धोकादायक ठरले आहे. परिणामी काही कुटुंबांनी स्वतःहून घरं रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केलं आहे.दरम्यान ही स्थिती लक्षात घेऊन कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन आवश्यक असल्याने माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी म्हटले आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत भूगर्भशास्त्रज्ञांसह महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पाहणीनंतर गावात भूगर्भातील हालचाली सुरू असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, संपूर्ण गाव भयग्रस्त वातावरणात जगत आहे. महिलांसह लहान मुलांमध्येही भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

तात्पुरत्या उपाययोजनेअंतर्गत ग्रामस्थांसाठी कपिलधार देवस्थान परिसरात निवाऱ्याची व्यवस्था

(उर्वरीत पान २ वर)

# नगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु
## दि.८ ऑक्टोबरला नगरसेवक आरक्षण सोडत



**प्रतिनिधी @ केज**

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्यागट–गणांच्याआरक्षण सोडतीनंतर आता नगरपालिकांच्या निवडणुकांच्या हालचालींना देखील वेग आला

(उर्वरीत पान २ वर)

# जाहिराती देत नसलेल्या नेत्यांच्या बातम्यावर भविष्यात बहिष्कार– संपादक संघ

**प्रतिनिधी @ बीड**

वृत्तपत्रांना जाहिराती न देणार्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या बातम्या छापण्यात येवू नयेत असे बीड मधील मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांनी आपसात विचार विनिमय करून निर्णय घेतला आहे. सर्व संपादकांनी सदर निर्णयाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आवाहन संपादक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व मराठी वृत्तपत्रे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्याच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मोठमोठ्या बातम्या छापल्या जातात. अनेक नेत्यांना प्रसिद्धी देवून वृत्तपत्रांनी मोठे केले आहे. त्यांना आमदार, खासदार, मंत्री करण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. अगदी ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नगर पालिका आदी कार्यकर्त्यांच्या पाठीशी वृत्तपत्रे उभी राहिली आहेत. परंतु हीच नेते मंडळी व कार्यकर्ते वृत्तपत्रांना जाहिराती देत नाहीत, जाहिराती देण्यासाठी आपला हात आखडता घेतात. मात्र निवडणुकीमध्ये कोट्यावधी रूपयांची उधळपट्टी करतात. अगदी गल्ली बोळात निवडणुक काळात हीच मंडळी लाखो रूपये रेवड्या–फुटाणे वाटावेत तसे वाटतात. परंतु त्यांना मोठे करणार्या वृत्तपत्रांकडे कानाडोळा करतात. वृत्तपत्राचा वर्धापन दिन असेल, दीपावली अंक असेल अथवा नेत्यांचे वाढदिवस असतील जाहिराती

(उर्वरीत पान २ वर)

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि.बा.पाटील यांचेच नाव देण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विमानतळाच्या नामकरणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सकारात्मक प्रतिसाद
## राज्यातील पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळांचादेखील लवकरच नामविस्तार



**प्रतिनिधी @ मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्यात येणार असून या अनुषंगाने नुकतेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी विनंती केली होती. या नामकरणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळांच्या नामकरणासाठीही लवकरच मान्यता मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत राज्य शासनाचा इरादा बदललेला नाही आणि केंद्र शासनाचा देखील वेगळा विचार नाही. असे स्पष्टपणे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ' केंद्र शासनाने विमानतळ बांधकामाला परवानगी देताना ' नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' अशा नावाने पूर्वी परवानगी दिली

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# करुणा-मैत्रीच्या मार्गानेच मानवतेचा उद्धार धम्मपरिषदेत डॉ.खेमधम्मो महाथेरोंचे प्रतिपादन

## शिवणी येथे महाविहार धम्मभूमीत लोटला जनसमुदाय

प्रतिनिधी @ बीड

जगाला प्रज्ञा, शील, करुणा-मैत्रीची शिकवण देणारा, मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे सम्यक संबुद्ध गौतम बुद्ध होय. त्यांनी दिलेला धम्म म्हणजे केवळ एका धम्मपथाचा उपदेश नसून, मानवी जीवनाला दिशा देणारा शाश्वत मार्ग आहे. असे विचार उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद पार पडली. सदरील धम्मपरिषद प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो बोलत होते.

या धम्मपरिषदेला संस्थेचे सचिव तथा धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. इंदवंस्स महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, समाज कल्याण आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण



आयुक्त रविंद्र शिंदे, समाज कल्याण सहसंचालक डी. बी. क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ. सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती होती.

पुढे धम्मदेसना देताना भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो म्हणाले की, गौतम बुद्धांच्या शिकवणीमुळे समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि असमानता यांना जबर धक्का बसला. म्हणूनच विज्ञानावर आधारलेला बौद्ध धम्म आज जागतिक पातळीवर स्वीकारला जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्याला बौद्ध धम्माची दीक्षा देवून उद्धार केला आहे. त्या धम्म प्रवर्तन दिनाला आज ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच भिक्खु धम्मशील थेरो यांच्या संयोजनातून ही धम्मपरिषद होत असून ही बाब गौरवास्पद आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार अधिक गतीने होण्यास मदत होत आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.

### असे पार पडले उपक्रम...

दरवर्षी प्रमाणे नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदिप रोडे यांच्याकडून भोजनदान देण्यात आले. शिवणी येथे धम्मपरिषदेला जाण्यासाठी मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली होती. या धम्मपरिषदे निमित्त विविध कार्यक्रम पार पडले. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झालेल्या उपासक आणि उपासिका यांच्या धम्म रॅलीने शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

# राज्यातील सर्व संवर्गातील सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करणार-मुख्यमंत्री


प्रतिनिधी @ मुंबई

राज्य शासनाच्या प्रत्येक संवर्गातील पदे आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये कालानुरूप मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे, हे लक्षात घेऊन राज्यातील सर्व संवर्गातील पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात येणार आहे, असे सांगून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पदभरती प्रक्रिया गतीशील करून २०२६ या वर्षात मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. शासकीय सेवेत आज नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी लोकाभिमुख आणि पारदर्शी पद्धतीने आपले काम करावे असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सामान्य प्रशासन विभागातर्फे अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरणाच्या राज्य रोजगार मेळाव्याच्या राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ व तापी व कोकण खोरे विकास महा.), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पणन, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार परिणय फुके, आमदार अबु आझमी, आमदार मनोज जामसुतकर, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, कोकण विभागीय आयुक्त विजयकुमार सुर्यवंशी, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आदी मान्यवर उपस्थित होते.

# सौ. के.एस.के. महाविद्यालयात लोकनेत्या मा.खा.केशरबाई क्षीरसागर यांची पुण्यतिथी निमित्त अभिवादन



प्रतिनिधी @ बीड

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकनेत्या माजी खासदार स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू यांना एकोनिसाव्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# जागतिक स्तरावर यशस्वी होण्यासाठी आयटी कौशल्य आत्मसात करणे गरजेचे - प्रा. नितीन काळे

### तुलसी महाविद्यालयाच्या पालक सभेत उत्साही प्रतिसाद

प्रतिनिधी @ बीड

आजच्या काळात विद्यार्थ्यांनी आयटी कौशल्य आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य डिग्री, कंप्युटर ज्ञान, कामाचा अनुभव आणि इंग्रजीवर प्रभुत्व असल्यासच चांगल्या नोकऱ्या मिळू शकतात, असे मत प्रा.नितीन काळे यांनी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे दि.४ ऑक्टोबर रोजी झालेल्या पालक मेळाव्यात सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. प्रदीप रोडे यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्राचार्य प्रा. डी.डी. राऊत उपस्थित होते. प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, बदल हा निसर्गाचा



नियम आहे. जो बदल स्वीकारत नाही, तो काळाच्या पडद्याआड जातो. चांगल्या गोष्टी शिकवाव्या लागतात, पण वाईट गोष्टी आपोआप शिकल्या जातात. आयुष्यभर आनंदाने जगायचे असेल तर फक्त तीन वर्ष कठोर मेहनत घ्या.

प्रा.अर्जुन राठोड यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले, वेळ आणि संधी कोणासाठीही थांबत नाहीत. मोबाईल आणि व्यर्थ गोष्टींचा दुरुपयोग टाळून वेळेचा योग्य उपयोग केल्यास यशस्वी होणे शक्य आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांनी केले आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक प्रगतीसाठी पालक-शिक्षक संवादाची गरज अधोरेखित केली. डॉ. विकास वाघमारे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती पीपीटीद्वारे सादर केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले तर आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# जातीची बाधा

सार्वजनिक जीवनात जातीचं अवास्तव स्तोम माजत असल्याचं चित्र सर्वत्र दिसत असताना, उत्तर प्रदेश सरकारने रविवारी जातीच्या सार्वजनिक उल्लेखांवर, जातनिहाय राजकीय मेळावे आयोजित करण्यावर बंदी घातली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानंतर उत्तर प्रदेश सरकारचे मुख्य सचिव दीपक कुमार यांनी जातीच्या सार्वजनिक प्रदर्शनाला बंदी घालणारा दहा कलमी आदेश जारी केला आहे. उत्तर प्रदेशातल्या राजकारणात या आदेशाचे वेगवेगळे अर्थ काढले जात असून पक्षानुसार नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. देशात अन्यत्र याबाबत अजून फारशी चर्चा नाही. पण, सर्वसाधारणतः या आदेशाबद्दल समाधानच दिसत आहे. जात प्रत्येकालाच हवी असते. 'जातीभेद नको; तेवढेच पुरेसं' अशीच बहुतेकांची भूमिका असते. जातीभेदाचे चटके सोसलेल्या या समाजात, जातीनिर्मूलनाच्या ध्येयाने तयार केलेल्या अभ्यासक्रमातून काहीएक संस्कार झाल्याने जातीभेदाचं समर्थन आता उघडपणे कोणी करत नाही. समाजातून जातीचा बडेजाव कमी व्हावा, याबाबतही एकमत असतं. पण, शेवटी रीतीरिवाज, कर्मकांड, 'परंपरा जपण्या'च्या ओझ्याखाली प्रत्येकजण आपापल्या जातीत आपोआप बंदिस्त होतो, ही वस्तुस्थिती आहे. जन्मदाखल्यावरील नोंदीपासून शाळाप्रवेश आणि नंतर मृत्यूपर्यंत ही जात कोणालाच सोडत नाही. त्यामुळे जी गोष्ट आपल्याला जन्मजात चिकटते, तिची अस्मिता झाल्याशिवाय राहत नाही. अशी अस्मिता एकदा का अंगात भिनली, की त्याची पुढची पायरी दुराभिमानाची असते. त्यातून स्वजातीचं समर्थन, उदात्तीकरण सुरू होतं आणि तीच सार्वजनिक जीवनातील अस्तित्वाची खूण होते. विवाहसंस्था जातीव्यवस्थेच्या बळकटीकरणाला भक्कम अधिष्ठान पुरवत असते. कुटुंबव्यवस्थेचं मूळच विवाहसंस्थेत असल्याने साहजिकच कुटुंब, नातेवाईक, भाऊबंद अशी वर्तुळं विस्तारत जातात. ही वर्तुळच आपल्याकडे व्यक्तीच्या सामाजिक जीवनाचा आधार होतात. पर्यायाने जात हाच आपल्या जगण्याचा आधार आहे, हा समज बळकट होतो. हा समज जातीनिर्मूलनाच्या स्वप्नाला उद्ध्वस्त करतो आणि 'जात नाही ती जात' हा समज अगदी बळकट करतो.

या समजाला धक्का देण्याचा प्रयत्न अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विनोद दिवाकर यांनी केला. प्रकरण जातीभेद किंवा जातीय अत्याचाराचं नव्हतं. प्रकरण होतं, बेकायदा दारूच्या तस्करीचं. त्यातील आरोपी प्रवीण छेत्री याने आपल्याविरुद्धचे आरोप रद्द व्हावेत, अशी याचिका उच्च न्यायालयासमोर केली होती. त्या अर्जासोबतची कागदपत्रं पाहताना न्यायमूर्ती दिवाकर यांना या प्रकरणाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीच्या नावापुढे त्याची जात लिहिली असल्याचं लक्षात आलं. दिवाकर यांना ही बाब खटकली. त्याबाबत विचारणा केली, तेव्हा गुन्ह्यांच्या नोंदी करताना जातीची नोंद करण्याची प्रथा असल्याचं पोलिसांच्या वतीने त्यांना सांगण्यात आलं. या प्रथेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना दिवाकर यांनी जातीचा आणि गुन्ह्याचा संबंध काय? अशी विचारणा करून ही प्रथा ताबडतोब थांबवा, अशा सूचना दिल्या. सोबत 'वाहनांवर, घरांवर जातीचा उल्लेख करण्याची पद्धतही चुकीची आहे. त्यामुळे, जाती व्यवस्थेला प्रतिष्ठा आणि त्यातून बळकटी मिळते' असंही मत कठोरपणे मांडलं. दिवाकर यांच्या या मतप्रदर्शनानंतरच योगी आदित्यनाथ यांनी निर्णय घेतला आणि उत्तर प्रदेशात जातीच्या सार्वजनिक प्रदर्शनाला बंदी घातली. योगी यांचा हा निर्णय प्रागतिक दिसत असला, तरी त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः केंद्र सरकारने घेतलेल्या जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पुन्हा आपल्याकडे व्यवसायावरूनही अनेक जाती ओळखल्या जातात. अनेकांची आडनावंही त्यांच्या जातीचीच असतात. ज्ञातीच्या स्वतःच्या संस्था, मंदिरं-देवस्थानं, नोंदणी केलेल्या संघटना असतात. जातींचे स्वतःचे आद्य गुरू, समाजपुरुष असतात. त्यांच्या जयंती, पुण्यतिथी संबंधित जातीच साजऱ्या करत असतात. या सगळ्याचं यापुढे काय करायचं? 'जातीच्या राजकीय मेळाव्यांना बंदी' असं म्हटलं असल्याने यापुढे जाती आधारित धार्मिक, सामाजिक कार्यक्रम, उपक्रम करायचे की नाहीत? देशात अनेक व्यवसायात काही विशिष्ट जातींचंच प्राबल्य असल्याने त्या व्यवसायानुसार त्यांचे काही विशिष्ट सण, पवित्र दिवस असतात. ते सार्वजनिकरीत्या साजरे केले जातात. अशा सांस्कृतिक वारशाला कसं नाकारता येईल?

पान १ वरून...

**कपिलधारवाडीचे तात्काळ...**

करण्यात आली आहे. मात्र हा केवळ तात्पुरता उपाय असून, कायमस्वरूपी सुरक्षिततेसाठी गावाचे पुनर्वसन अपरिहार्य असल्याचे प्रा. सुरेश नवले यांनी स्पष्ट केले आहे.

गाव पुनर्वसनासाठी पाली ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ६११ मधील ६८ एकर गायरान जमीन उपयुक्त ठरू शकते, असा प्रस्ताव ग्रामस्थांनी एकमुखाने मांडला आहे. ही जागा भूगोलाच्या दृष्टीने सुरक्षित असून, येथील शेती आणि नव्या वस्तीचा समन्वयही सहज शक्य आहे. त्यामुळे या ठिकाणी कपिलधारवाडीचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.प्रा. नवले यांनी शासन आणि प्रशासनाकडे सादर केलेल्या पत्रात म्हटले आहे की, गट क्रमांक ६११ मधील गायरान जागेवर कपिलधारवाडीचे पुनर्वसन हा कायमस्वरूपी आणि तर्कसंगत तोडगा ठरू शकेल. प्रशासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.सध्या गावातील नागरिक अत्यंत भीतीच्या छायेत दिवस काढत असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिकच गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा वेळी कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन करणे ही मानवी आणि प्रशासकीय दोन्ही दृष्ट्या तातडीची गरज असल्याचे मत प्रा.नवले यांनी व्यक्त केले आहे.यावेळी शिवाजीराव नवले श्रीमंतरावजी उबाळे केशव शिंदे रुद्राक्ष माकले सुदर्शन शिंदे बंडू भोसले संजय सल्लागार योगेश सव्वाशे नवनाथ शिंदे लक्ष्मण जाधव नानाभाऊ शिंदे बप्पा शिंदे दुर्गाबाई शिंदे अहिल्याबाई शिंदे या बाई शिंदे साहेबराव शिंदे आशाबाई माखले आदी उपस्थित होते.

**स्व.काकूंचे जीवन .....**

करण्यात आले होते. सर्वप्रथम क्षीरसागर कुटुंबीयांच्या वतीने काकूंना अभिवादन करण्यात आले त्यानंतर भरगच्च भरलेल्या मैदानात कीर्तनाला प्रारंभ झाला. यावेळी किर्तन सांगताना रामायणाचार्य ढोक महाराज म्हणाले की, माय गेली बाप गेला आता सांभाळी विठ्ठला या संत जनाबाईंचा अभंग घेत ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या स्व.काकूंच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी मोठा चाहता वर्ग उपस्थित असतो. एवढ्या मोठ्या कार्यक्रमात कुठलीही कसर न करता योग्य आणि सुंदर नियोजन करून हा स्मृती सोहळा साजरा होत असतो. पुण्याचा संचय करतो तो पुण्य आत्मा असतो परोपकार हेच पुण्य असते तसे काकूंचे काम होते. हजारो परिवारांना आधार देणारी परोपकारी महिला म्हणून काकूंचा आदर्श घेण्यासारखा आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी परोपकारी म्हणून जगले. जगातले सर्वात मोठे तीर्थक्षेत्र म्हणजे आई आणि वडील आहेत आधी त्यांची सेवा करा बाकीचे पुण्य आपोआप पदरात पडेल. तीर्थालाही पवित्र करणारी सेवा म्हणजे माता-पित्याची सेवा आहे. भक्त पुंडलिकाच्या भक्तीला भारावून जगाचा बाप आजही पंढरपुरात उभा आहे हे माता-पित्यांचे प्रेम आज जगाला प्रेरणा देणारे आहे. जेव्हा चांगले दिवस येतात तेव्हा आईबाप जिवंत नसतात ज्यांचे आहेत ते भाग्यवान आहेत पण काही कारटे आपल्या आई बापाला वाऱ्यावर सोडून देतात जन्मदात्याच्या आनंदात जो आपला आनंद शोधतो त्याला देवाची सेवा करण्याची गरज नाही, आई-वडिलांचा आशीर्वाद आणि आनंद आयुष्यभर पुरतो त्यामुळे रडायचं असेल तर देवाजवळ रडा माणसा पुढे रडू नका देव मार्ग काढतो पण माणूस तुमची फुकटची प्रसिद्धी करतो जोपर्यंत जिवात जीव आहे तोपर्यंतच मनुष्याला किंमत असते त्यामुळे चांगले कर्म केले तर नाव होईल आणि कुकर्म केले तर बरं झालं हे गेलं अशी वाक्य ऐकायला येतील त्यामुळे परोपकारी जीवन जगून सदाचारी व्हा असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, अत्यंत बिकट अवस्था असतानाही स्व.काकूंनी आपले स्वतःचे शिक्षण पूर्ण करून स्वतःच्या घराला सावरले आहे त्यांच्यावर जे-जे प्रसंग आले ते लक्षात घेऊन त्यांनी महिलांना सक्षम करण्यासाठी शिक्षण संस्था सुरू केल्या हजारो गोरगरिबांना मदत करून सर्व जाती धर्मातील लोकांना बरोबर घेऊन राजकीय वाटचाल केली गरिबी परिस्थितीत स्व.काकूंनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांना याची जाणीव होती म्हणूनच त्यांनी तळागाळातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी आपल्या संस्थेच्या माध्यमातून मोठा विस्तार केला आणि आज या सर्व संस्था वटवृक्षाप्रमाणे फुलत आहेत. काकू आमची आई असली तरी त्या बीड जिल्ह्याच्या काकू होत्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल आदराचे स्थान होते. काकू म्हणजे बीड जिल्ह्याचा ठेवा आहेत याची आम्हालाही जाणीव

पान १ वरून...

आहे. बीड जिल्ह्यात रेल्वे यावी यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न झाकले जाणार नाहीत १९९५-९६ ला पहिला निधी मिळवला आणि पुढे या रेल्वे मार्गाच्या प्रक्रियेला गती मिळाली सातत्याने पाठपुरावा करून अत्यंत संयमाने आणि प्रेमाने त्यांनी सेवाभाव ठेवला जनतेची सेवा केली जोपर्यंत आहोत तोपर्यंत जनतेची सेवा करायची प्रश्न सोडवताना पोट तिडकीने सोडवण्याचा प्रयत्न करायचा असे त्यांचे कार्य होते. सामाजिक विन सध्या विस्कटलेली आहे ती जोडण्याचे काम यापुढे करावे लागणार आहे. सगळ्यांना बरोबर घेऊन राजकीय वाटचाल करून आम्ही काकूंचा वारसा पुढे चालवत असल्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक काकू नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.कालिदास थिगळे यांनी केले.

यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भप. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज, ह.भ.प. नवनाथ महाराज, ह.भ.प. अखंडानंद महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, ह.भ.प. रामहरी महाराज, ह.भ.प. अभिमान महाराज, ह.भ.प. हरिभाऊ महाराज काळे, ह.भ.प. रोडे महाराज, ह.भ.प. अविष्कार महाराज, ह.भ.प. मोटे महाराज, ह.भ.प. परशुराम मराडे, ह.भ.प. जनार्दन महाराज तिळवणे, सुरेश क्षीरसागर, डॉ.सौ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, विजूताई महिंद्रे, बेबीताई भांडकर, विशाल क्षीरसागर, जगदीश काळे, दिनकर कदम, अरूण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, नानासाहेब काकडे, सुधाकर मिसाळ, बाबूशेठ लोढा, विलास विधाते, विनोद मुळूक, मुखीद लाला, अर्जुन बहीरवाळ, अंकुश राठोड, तानाजी कदम, राणा चौहाण, प्रमोद शिंदे, अरूण बोंगाणे, सखाराम मस्के, सुभाष क्षीरसागर, मनोज मस्के, बंडू निसर्गंध, गोरख दन्ने, मुन्ना फुटाणे, अंबादास गुजर, भास्कर जाधव, शिवाजी जाधव, माधवराव मोराळे, शेख ईरफान, जमील भाई, रऊफ भाई जवारीवाले, बी.टी. बहीर, एस.टी. नखाते, आसाराम औसरमल, जमीलभाई, शेख पाशा भाई, चंद्रकांत पेंढारे, अशोक कुलकर्णी, स्वरूप राठोड, महादेव खोसे, जयश्रीताई विधाते, बालाप्रसाद जाजू, आमेर सिध्दीकी, ॲड. जयंत राख, ॲड.विष्णूपंत काळे, ॲड.राम दहिवाळ, ॲड.श्रीराम लाखे, ॲड.महेश गर्जे, ॲड.सदाशिव राहिंज, ॲड.अजय राख, ॲड.मुसा पटेल, ॲड.प्रशांत देशपांडे, ॲड, राजेंद्र राऊत, पत्रकार अशोक देशमुख, दिलीप खिस्ती, सुनिल क्षीरसागर, रवि उबाळे, बालाजी तोंडे, उदय जोशी, संजय मालाणी, जालिंदर धांडे, नारायण नागरे, नसीर पठाण, डॉ.भागवत मोटे, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, शारदाताई डुलगज, संजय होळकर, गोगो मिसाळ, नितीन साखरे, नामदेव दुधाळ, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, नवनाथ कुलकर्णी, विठ्ठलराव साळूंके, दत्तात्रय शिंदे, अशोक शेटे, धनंजय वाघमारे, शुभम धूत, शुभम कातांगळे, दिनेश पवार, मिलिंद ठोकळ, जैतुल्ला खान, प्रेमलता चांदणे, बाबूराव राठोड, सतीश पवार, रविंद्र पवार, आशिष काळे, दत्तात्रय बारगजे, प्रा.दत्तात्रय आघाव, परमेश्वर सातपुते, राजेंद्र बन्सोडे, सुभाष संचेती, कलंदर पठाण, शालिनीताई परदेशी, कोमलताई राजपुत, निता कांबळे, सुजाता कांबळे, शेख शाकेरा, संगिताताई वाघमारे, शरद ढाकणे, सुभाष सपकाळ, विश्वांभर सावंत, रूस्तूम बेदरे, नागेश तांबारे, अशोक वीर, बाबूशेठ नहार, अतुल मौजकर, विष्णू वाघमारे, सुलेमान पठाण, मिनाताई उगलमुगले, अमोल पौळ, नामदेव गायकवाड, मुन्ना ईनामदार, दिनेश परदेशी, विजय सरवदे, अक्षय रणखांब, हनुमान देवकते, अंकुश उगले, दिलीप शेळके, डॉ.महेशकुमार वनवे, राजु मुनोत, मन्मथआप्पा हेरकर, विठ्ठल गुजर, सतीष राठौर, कैलास मैड, हनुमान डहाळे, प्रकाश इंगळे, आत्माराम पवार, अरूण बरकसे, अरूण गोरे, नागेश शिंदे, बाबूराव केदार, पोपट शिरसाट, दिलीप बडे, मंगेश लोळगे, सतीश काटे, डॉ.गोपाल चौसाळकर, संजय लोणीकर, डॉ.किशोर वरपे, तुषार घुमरे, बाबू करांडे, सेवानंद कदम, भरत लोळगे, बबन डोईफोडे, शशिकांत माने, राहिदास रोहिटे, नंदकुमार कुटे, बिभीषण घुगे, बप्पासाहेब घुगे, कल्याण कुटे, सय्यद लुकमान, मारोती वाघ, प्रभाकर सानप, नवनाथ सानप, सुभाष धस, बाबूशेठ नहार, नवनाथ घोडके, बंडू घुमरे, प्रशांत लांडे, ओमप्रकाश खवतड, उध्दव म्हेत्रे, माणिक वाघमारे, रमाकांत मुंडे, गणेश राऊत, संजय सानप, सर्जेराव खटाणे, गहिनीनाथ पाखरे, सुर्यकांत माने, विश्वास आखाडे, जयश्रीताई मुंडे, पांडूरंग भोसकर, भिमराव नरवडे, शंकर काशिद, शहादेव सदाफुले, डॉ.अरूण भस्मे, डॉ.राजा मचाले, एम.ए. राऊत, योगेश पवार, गोविंद साळूंके, सचिन भोज यांच्यासह महिला पुरूषांची उपस्थिती होती.

पान १ वरून...

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय...**

होती, त्यामध्ये नामविस्तार होऊन आता लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे होईल. राज्य शासनाने पाठविलेल्या प्रस्तावानुसारच विमानतळास नाव देण्यात येईल', असा प्रतिसाद प्रधानमंत्री मोदी यांनी दिला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रत्यक्षात प्रवासी वाहतूक सुरू होईल, तेव्हा 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' अशीच अधिकृत उद्घोषणा निश्चितपणे होईल. या 'ड्राय रन' कालावधीत विमान प्रवासी यांचे पुढील कालावधीचे आगाऊ बुकिंग नोंदवणे, तांत्रिक बाबींची सज्जता अशा स्वरूपाची कार्यवाही होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**जाहिराती देत नसलेल्या ...**

देण्याचे टाळतात. काही नेते जाहिराती देतात बिले देत नाहीत. तर दुसरीकडे लावणी महोत्सव साजरे करून बायका नाचवायच्या व कोट्यवधीचा खर्च करायचा असेही काही नेत्यांचे धंदे आहेत. तर काही नेते तर स्वत:ला राष्ट्रीय नेते म्हणवून घेतात व नुसते गोड बोलतात. गोड बोलण्याने वृत्तपत्रे चालत नाहीत किंवा तुमच्या मोठेपणाच्या कोरड्या आश्वासनावर सुद्धा वृत्तपत्रे चालत नाहीत.

वृत्तपत्राच्या खर्चाचा विचार केल्यास आज अनेक पटींनी खर्च वाढलेला आहे. तीन-पाच रूपयात काय मिळते? वृत्तपत्रे सामान्य माणसांचा आजही मोठा आधार आणि विश्वास आहे. सामान्य माणूस मग तो ग्रामीण भागातील असो की शहरी माणुस असो तो आजही लाखोंच्या संख्येने वृत्तपत्रांचे वाचक आहेत. आम्ही छापलेल्या बातम्या त्यांच्यापर्यंत पोचतात. अजूनही सामान्य जनतेचा छापील वृत्तपत्रावर व त्यातील बातम्यावरच विश्वास आहे आणि म्हणुन ही सर्व मराठी वृत्तपत्रे ठामपणे उभी राहणे आवश्यक आहे. म्हणून नेते व कार्यकर्त्यांच्या जाहिरातरूपाने सहकार्याची अपेक्षा आहे.

परंतु जे नेते व कार्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. स्थानिक वृत्तपत्रांना जाहिराती देत नसतील त्यांच्या बातम्यावर बहिष्कार टाकण्याचा व त्यांच्या बातम्या छापण्यास टाळण्याच्या बीडच्या संपादकांनी आपापसात संवाद करून निर्णय घेतला आहे. लवकरच सर्व संपादकांची बैठक बोलावली जाणार असल्याचे संयोजकांनी म्हटले आहे.

**नगरपालिकांच्या निवडणुकीची ...**

आहे.नगराध्यक्ष पदासाठीची आरक्षण सोडत सोमवारी दि.६ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात होत असतानाच,राज्य निवडणूक आयोगाने नगरसेवकांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रमही जाहीर केला आहे.त्यानुसार दि.८ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यभरातील सर्व नगरपालिकांमध्ये नगरसेवक पदासाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनां नुसार,जिल्हा अधिकाऱ्यांनी प्रत्येक नगरपालिकेसाठी स्वतंत्र उप जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करणेआवश्यक असून,त्यांच्या देखरेखी खाली ही सोडत पार पडणार आहे.या प्रक्रियेत अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय नागरिक, त्यातील महिला तसेच सर्वसाधारण महिला यांसाठी आरक्षणाची सोडत काढली जाईल.

विशेष बाब म्हणजे, नगरपालिकांमध्ये देखील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रमाणेच पहिली निवडणूक हा निकष ठेवून चक्राकार पद्धतीने आरक्षण फिरविण्यात येणार आहे.त्यामुळे संबंधित नगरपालिकां तील पूर्वीच्या आरक्षणाचा विचार या वेळेस केला जाणार नाही.राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला आता वेग आला असून, जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगरपालिकां च्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने एकाच वेळी हालचाली सुरू केल्या आहेत.नगरसेवकांच्या आरक्षण सोडतीनंतर नगरपालिकांच्या निवडणुकीचे वेळापत्रक लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

दि.६ ऑक्टोबरला नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण सोडत मंत्रालयात होणार असून ८ ऑक्टोबरला नगरसेवक पदांसाठी राज्यभरात आरक्षण सोडत उप जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आरक्षण सोडत प्रक्रिया पहिली निवडणूक निकषावर चक्राकार पद्धतीने आरक्षण लागू होणार आहे.ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि नियमा नुसार होण्यासाठी राज्य निवडणूकआयोगाकडून काटेकोर व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे.

# ज्ञानोदय विद्या प्रसारिणीमध्ये शिक्षक पालक मेळावा संपन्न

## पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलांचा आदर करावा-प्रा प्रदीप देशमुख

प्रतिनिधी @ मंठा



पालकांनी आपल्या पाल्यांकडून अपेक्षा ठेवताना त्यांचा कल आणि क्षमतेचा विचार केला पाहिजे. पालक आणि शिक्षकांच्या योग्य समन्वयातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे असे प्रतिपादन प्रा.प्रदीप देशमुख यांनी मंठा येथील शिक्षक-पालक मेळाव्यात बोलताना केले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष अंकुशराव मोरे, केंद्रप्रमुख शिवाजीराव देशमुख, प्रा.अनिल बोराडे , रावसाहेब शिंदे, दुष्यंतराव बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील ज्ञानोदय विद्याप्रसारिणी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी शिक्षक-पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. सुरुवातीला राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सरस्वती देवीच्या प्रतिमांचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. मानसी गोरडे आणि सोनल घोडके यांनी स्वागत गीत गायले. यावेळी उपस्थितांसमोर आपले विचार व्यक्त करताना प्रा.प्रदीप देशमुख पुढे म्हणाले की, अमुक एका क्षेत्रातच विद्यार्थ्यांनी करिअर घडवले पाहिजे असा अट्टाहास पालकांनी करू नये , तर त्याची आवड लक्षात घ्यावी. शिक्षणातून केवळ डॉक्टर्स आणि इंजिनियर्स निर्माण झाले पाहिजेत एवढाच निकष असून चालणार नाही. शिक्षण म्हणजे बाहेरून लादण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत असणाऱ्या कलागुणांना विकसित करण्याची प्रक्रिया आहे. लहान मुले केवळ सांगून नव्हे तर अनुकरणातून शिकत असतात. तेव्हा त्यांच्यासमोर शिक्षक पालकांनी आदर्श ठेवले पाहिजेत. याप्रसंगी बोलताना केंद्रप्रमुख शिवाजीराव देशमुख म्हणाले की, शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेतले पाहिजे. शिक्षक पालक यांनी वेळोवेळी संपर्क ठेवून आपल्या पाल्यांविषयी आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेविषयी विचार केला पाहिजे. पालक मेळाव्याच्या आयोजनातूनच शाळेचा पालकांची संवाद होऊ शकतो असे त्यांनी सांगितले. यावेळी मुख्याध्यापक विठ्ठल रासे यांनी शाळेच्या शैक्षणीक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोप करताना संस्थाध्यक्ष अंकुशराव मोरे म्हणाले की, शाळेतील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. यापुढेही विद्यार्थ्यांना सर्व भौतिक सुविधेसह गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. बदलत्या काळात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्काराची ही गरज असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निकिता मोरे यांनी केले. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून एकनाथ काकडे, डॉ.माधुरी कामटे, पल्लवी मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश खिस्ते यांनी केले तर आभार महेक पठाण यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणात पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.



# राजेंद्र मनोर सर सेवापुर्ती निमित्त व सोलनकर ,वाघमारे, कोरे यांच्या बदलीनिमित्त निरोप समारंभ कार्यक्रम

निरोप समारंभात विद्यार्थ्यांना एकत्र आणून एक अविस्मरणीय कार्यक्रम

प्रतिनिधी @ शहागड

अंबड तालुक्यातील शहागड येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेतील राजेंद्र मनोर सर यांच्या सेवापूर्ती निमित्त पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला येथे शुक्रवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.वयोमानानुसार मनोर सर हे ३० सप्टेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले गोदावरी नदीच्या पुर परिस्थती मुळे शाळेला सुटी असल्याने हा कार्यक्रम ०३ ऑक्टोबर ला घेण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक सी.आर वाहुळे होते,प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष अशफाक शेख, उपाध्यक्ष भगवान माने, रिजवान शाह,नियाजोद्दीन शाह (धन्नु भाई) यांची उपस्थिती होती. राजेंद्र मनोर सर यांचा सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ बरोबर सोलनकर,वाघमारे,कोरे,या शिक्षकांचे बदली झाल्यामुळे त्यांचा पण सत्कार करण्यात आला व त्यांच्या जागी निशिकांत मिरकले,जाधव,बावचे,श्रीमती केचाळे मॅडम या शिक्षकांचा देखील सत्कार करून स्वागत करण्यात आला.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक सी.आर वाहुळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षक राजेंद्र मनोर सर यांचा यथोचित सत्कार करून गौरव करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.राजेंद्र मनोर सरांनी केलेल्या निःस्वार्थ सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या समारंभाच्या माध्यमातून निवृत्त शिक्षक मनोज सर यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या

कार्यक्रमासाठी शहागड पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक सी.आर वाहुळे,शिक्षक भारत खेडकर,बाळा पानसरे,अतिम कांबळे,रितेश दरगुडे,संदीप नरसाळे,निशिकांत मिरकले

शिंदे,तांबोळी,गवारे,निर्मळ ,सावंत,जाधव,बावचे,श्रीमती केचाळे मॅडम,राठोड

# केंद्रीय युवा महोत्सवात अंकुशराव टोपे महाविद्यालयाचे घवघवीत यश

प्रतिनिधी @ जालना



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे २७ ते २९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पार पडलेल्या केंद्रीय युवा महोत्सवात जालना येथील अंकुशराव टोपे महाविद्यालयाने राज्य पातळीवर घवघवीत यश मिळवत आपले व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

सलग दुसरे वर्ष गाजवले यश महाविद्यालयाचे विद्यार्थी भक्ती घुमरे,भूमी झाडीवाले व पवन सांगळे यांनी प्रश्नमंजुषा प्रकारात सलग दुसऱ्या वर्षी पारितोषिक पटकावत महाविद्यालयाचा मान उंचावला. भरतनाट्यममध्ये अनपेक्षित गाजले यश भरतनाट्यमचा कोणताही वारसा किंवा क्लास नसतानाही कु. स्नेहा गवई हिने आपल्या प्रतिभेच्या जोरावर भरतनाट्यम प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट संघ जालना जिल्हा स्तरावर झालेल्या युवा महोत्सवात देखील अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या संघाने जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट संघ म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. प्रशासन व संस्थेचे कौतुकाचे वर्षावविजयी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मा.आ. राजेशभैय्या टोपे, सचिव सौ. मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी.आर. गायकवाड व सह-प्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील व डॉ. पांडुरंग खोजे यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रामनाथ सांगुळे, प्रा. सीमा निकाळजे, प्रा. डॉ. संतोष करवंदे, प्रा. डॉ. श्रीपत गायकवाड, प्रा. बाळासाहेब परमेश्वर, प्रा. दीपक कारके, प्रा. भगवान मरकड, प्रा. शकुंतला मस्के, प्रा. शिवकन्या वाडेकर, प्रा. पुष्पा कोकाटे व श्री. रघुनाथ शिंदे यांच्यासह

# विवेकानंद इंग्लिश स्कूल, मंठा येथे नवरात्रीत कन्यापूजन सोहळा

प्रतिनिधी @ मंठा

विवेकानंद इंग्लिश स्कूल, मंठा येथे नवरात्री उत्सवानिमित्त अष्टमीच्या दिवशी कन्यापूजन सोहळा मोठ्या उत्साहात व धार्मिक पद्धतीने मध्ये पार पडला.

हिंदू धर्मात नवरात्रीला विशेष महत्त्व आहे. या दिवसांत २ ते १० वर्षे वयोगटातील कुमारीकांची पूजा करण्याची परंपरा आहे. मुलींना साक्षात देवीचे रूप मानून त्यांच्या पायांचे पूजन, तिलक व जेवण घालून त्यांना भेटवस्तू देण्याची परंपरा प्राचीन काळापासून आहे. देवी भागवत पुराणातही कन्यापूजनाला महत्त्व देण्यात आले असून, मुलींची पूजा केल्याने माता दुर्गेची कृपा लाभते, जीवनात सकारात्मक ऊर्जा येते आणि अध्यात्मिक प्रगती साध्य होते, असे वर्णन आढळते.

याच परंपरेनुसार शाळेत झालेल्या पूजन सोहळ्यात अध्यक्ष आदरणीय श्री. संदीप बाहेकर यांनी स्वतः कन्यिकांचे पाय धुऊन त्यांना तिलक लावले व दर्शन घेतले. मुख्याध्यापिका श्रीमती रश्मी यादव यांनी मुलींचे पूजन करून त्यांना गोड खाऊ दिला. या वेळी मुलींच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणित झाल्याचे दृश्य पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत भरून राहिले.

कन्यिकांसाठी खाऊ म्हणून केळी, चणा मसाला, सोनपापडी, चॉकलेट तसेच शैक्षणिक उपयोगी भेटवस्तू देण्यात आल्या. शाळेचे अध्यक्ष व मुख्याध्यापिका यांच्या हस्ते भेटवस्तू व खाऊ स्वीकारताना मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला शिक्षकांनी परिश्रम घेतले. ठिकाणी प्रेरणादायी सुविचारांचे फलक लावण्यात आले होते व आकर्षक रांगोळीने परिसर सजवण्यात आला होता.



कन्यापूजन ही केवळ धार्मिक प्रथा नसून सांस्कृतिक वारशाचे आणि अध्यात्मिक जतनाचे प्रतीक आहे. महाभारतातील दुर्गासप्तशती ग्रंथातही कन्यापूजनाचा उल्लेख आढळतो, ज्यातून समाजातील स्त्रीशक्तीला गौरवण्याची परंपरा स्पष्ट होते.

अशा प्रकारच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची गोड परंपरा अनुभवायला मिळते, हेच या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

# कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालयात गांधी-शास्त्री जयंती व अभिजात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ घनसावंगी

मत्स्योदरी शिक्षण संस्था अंतर्गत कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घनसावंगी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. त्याचबरोबर अभिजात मराठी भाषा दिन सुद्धा साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला गांधीजी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वंदना सपकाळ यांनी भूषविले. विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर यांनी प्रास्ताविक करताना गांधीजींचे विचार, शास्त्रीजींचे कार्य तसेच अभिजात मराठी भाषेचे महत्त्व यावर सविस्तर भाष्य केले.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राजेंद्र मोरे होते. काही विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतांतून गांधी-शास्त्रींचे विचार, त्यांचे आदर्श जीवन तसेच मराठी भाषेच्या संवर्धनाचे महत्त्व स्पष्ट केले.या कार्यक्रमास कांता खोजे, संभाजी शिंदे, शंकर राठोड, नामदेव तोडकर, मोहसीन सय्यद, डॉ. लक्ष्मण गोरे, प्रा. राजेंद्र सानप, प्रा. वर्षा धाईत, विष्णू गणकवार, जगन्नाथ



जाधव, वंदना वाघमारे, हिरा टेकाळे, शामल कांगणे, अरुण राऊत, त्रिंबक लोंढे, विठ्ठल सोमवारे, संतोष घायाळ, बजरंग मोरे, रवी गवळी, संतोष लिंगणवाड, अच्युत रेचोडे, गीताराम शिंदे, सुनील मोताळे, गोविंद भुतेकर, भीमाशंकर वाघुंडे, राजाराम काळे, नागनाथ गोंडगिरे, अरुण नाटकर, पाराजी जवळकर, कृष्णा भापकर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहनाज पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन शबनम पठाण यांनी मानले.

# बारसवाडा गावात दसरा उत्साहात साजरा

## ग्रामदैवताच्या चरणी एकात्मतेचा सोहळा

प्रतिनिधी @ अंबड

तालुक्यातील येथील मौजे बारसवाडा गावात यंदाही दसरा सण पारंपरिक उत्साहात व भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामदैवत हनुमान मंदिरासमोर ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकत्र जमले आणि आपसातील सर्व मतभेद विसरून आपट्याच्या पानाचे सोन एकमेकांना देत शुभेच्छा दिल्या.ढोल-ताशांच्या गजरात गावातून भव्य रॅली काढण्यात आली. गावाच्या सीमारेषेवर



पोहोचल्यावर गावाचे पोलीस पाटील जगन्नाथ माळकरी यांच्या हस्ते विधिवत पूजा करून दसऱ्याच्या शुभारंभाचा मंगल सोहळा पार पडला.या सोहळ्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व ग्रामस्थांनी सहभाग नोंदवला. बालक-पालक, युवक-युवती, महिला-पुरुष यांचा उत्साह पाहून वातावरणात आनंद, ऐक्य आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडले.

# आ.हिकमत उढाण यांच्या हस्ते गोदाकाठच्या पूरग्रस्तांना आर्थिक मदतीचे वाटप

प्रतिनिधी @ घनसावंगी



अतिवृष्टी आणि महापुराच्या तडाख्यात सापडलेल्या गोदाकाठच्या गावांतील नागरिकांना दिलासा देण्यासाठी आ. हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते पूरग्रस्तांना आर्थिक मदत आणि प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम तहसील कार्यालय, घनसावंगी येथे तहसीलदार सौ. पूजा वंजारी आणि नायब तहसीलदार तोतला साहेब यांच्या उपस्थितीत पार पडला.गेल्या काही दिवसांपासून झालेल्या प्रचंड पावसामुळे गोदावरी नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील अनेक घरांमध्ये पाणी शिरून मालमत्तेचे व शेतपिकांचे मोठे नुकसान झाले. विजेच्या प्रहारामुळे काही जनावरेही मृत्युमुखी पडली.

शासनाची तातडीची मदत पूरग्रस्तांना दिलासा

शासनाकडून प्रत्येक बाधित कुटुंबासाठी स्नानगृह अनुदान रु.१०,०००/- आणि जनावरांच्या नुकसानीसाठी रु.३७,५००/- इतकी आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे.या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात लक्ष्मण साहेबराव काळे रा.रामसगाव यांना मदतीचे प्रमाणपत्र आमदार हिकमत उढाण यांच्या हस्ते देण्यात आले.

पूरग्रस्त नागरिकांच्या सोबत आम्ही खंबीरपणे आहोत आमदार उढाण या प्रसंगी बोलताना आ. हिकमत दादा उढाण म्हणाले गोदाकाठच्या गावांमध्ये आलेल्या पूराने जनजीवन विस्कळीत केले आहे. मात्र या संकटात शासन आणि आम्ही सर्वजण पूरग्रस्तांच्या सोबत ठामपणे उभे आहोत. प्रत्येक बाधित कुटुंबापर्यंत मदत पोहोचवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.ते पुढे म्हणाले नुकसानग्रस्त जमिनी आणि पिकांचे पचनामे तात्काळ पूर्ण करून मदत देण्याची प्रक्रिया गतीने पार पाडली जाईल. शासनाची प्रत्येक योजना थेट शेतकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे.अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या मदत वितरण कार्यक्रमाला तहसीलदार पूजा वंजारी, नायब तहसीलदार तोतला,संबंधित अधिकारी, स्थानिक पदाधिकारी तसेच कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधी अतिवृष्टी; तद्नंतर महापूर

## गोदाकाठच्या शेतकऱ्यांच्या मोटारी गेल्या वाहून

# अस्मानी संकटासह शेतकऱ्यांवर ओढावले आर्थिक संकट

प्रतिनिधी @ शहागड

शहागडसह परीसरात संततधार पावसामुळे अतिवृष्टी झाली आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने बांधावर जाऊन पंचनामे करण्यात येत होते.

त्यामुळे आपापल्या पिकांचे झालेले नुकसान दाखवण्यासाठी धडपडत असलेला शेतकरी बांधावर होता.त्यामुळे गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या विद्युत मोटारी, वायर, पाईप, सौर पंपावर चालणाऱ्या मोटारी ह्या गोदावरी नदीच्या काठावरच आहे तशा होत्या.

दि.२८ रविवारी रात्री गोदावरी नदीला महापूर आला, आणि शेतकऱ्यांच होतं नव्हतं विद्युत मोटारी, सौर पंप मोटारी, पाईप, वायर वाहून गेले.वाळकेश्र्वर येथील शेतकरी सय्यद इस्माईल, मधुकर मापारी, यांची पन्नास हजार रुपये किंमतीची विद्युत पाणबुडी मोटार केबल, पाईप वाहून गेले. तर कुरण येथील शेतकरी पांडुरंग वामन राक्षे यांचा साडेसात एचपीची मोटार, केबल, वायर पाईप असा एकूण एक लाख रुपयांचे साहित्य वाहून गेले आहे. त्यामुळे अगोदर अतिवृष्टी, तद्नंतर गोदावरी नदीला महापूर, या दोन झळा सोसत असतानाच आता या शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारीच गेल्या असल्याने त्यांना कना मोडला असुन, ते आर्थिक संकटात सापडले आहेत.

### शासनाने मदत करावी - मापारी

गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या विद्युत मोटारी, सौर ऊर्जा पंप, वायर, पाईप वाहून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी मधुकर मापारी, सय्यद इस्माईल, पांडुरंग राक्षे शेतकऱ्यांनी केली आहे.

# सारडा नगरीत दुर्गा भजनी मंडळाचा अनोखा दुर्गा उत्सव साजरा

## अष्टमीनिमित्त घागर फुंकण्याचा कार्यक्रम रंगला तर नवरात्रोत्सवात सौ प्रतिभा स्वामी यांच्या निवासस्थानी देवीची घटस्थापना

प्रतिनिधी @ बीड

शहरातील सारडा नगरी येथील सौ.प्रतिभा विशाल स्वामी यांच्या निवासस्थाने दुर्गा भजनी मंडळाने देवीची स्थापना करून घटस्थापना केली. संपूर्ण नवरात्रोत्सवात भजनी मंडळातील प्रत्येक सौभाग्यवतीच्या घरी आगळ्यावेगळ्या पद्धतीने भजन करून हा उत्सव आनंदी वातावरणात द्विगुणित करण्यात आला. २२ सप्टेंबर रोजी सारडा नगरीमध्ये वाजत गाजत देवीची घटस्थापना सौ प्रतिभा विशाल स्वामी यांच्या निवासस्थानी करण्यात आली. संपूर्ण नवरात्र उत्सवामध्ये सायंकाळी ४ ते ६



या वेळेत दुर्गा भजनी मंडळातील प्रत्येक सदस्य असलेल्या सौभाग्यवतीच्या घरी भजनी मंडळाचे कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने जोगवा, भारूड, गवळण, देवीची गाणे, आराधी गीते, संगीत रजनीसह देवी मातेच्या नावाचा गजर भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आला. अष्टमीचा मान घागर फुंकण्याचा होता. हा कार्यक्रम मोठा रंगतदार संगीत रजनीसह दिव्यांच्या आराधनेमध्ये करण्यात आला. यावेळी दुर्गा भजनी मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती कुलकर्णी यांच्यासह सौ. वर्षा पसारकर, सौ प्रतिभा स्वामी, सौ प्रमिला आरोळे, सौ.ज्योती डांगे, सौ. चित्रा देशपांडे,सौ. अंजली कुलकर्णी, सौ.ज्योती इनामदार, सौ. मीरा शेटे, सौ. संगीता रत्नपारखी, सौ.मीरा देवगावकर, सौ.आशा कुलकर्णी, सौ. विना देशपांडे या भजनी मंडळातील सदस्यांनी मोठ्या उत्साहाने दुर्गा उत्सवामध्ये सहभाग घेतला. अष्टमीच्या घागरी पूजनाप्रसंगी वर्षा स्वामी यांची देखील विशेष उपस्थिती लाभली. सौ.प्रतिभा स्वामी यांच्या निवासस्थानी अष्टमीच्या दिनी सुहासिनींना खणा नारळाने सन्मानित करण्यात आले. सारडा नगरीत मोठ्या उत्साहामध्ये यावर्षी दुर्गा भजनी मंडळीच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे नवरात्रोत्सव मोठा रंगतदार रंगला.

# आज स्व.पांडुरंग गोरकर यांना पेन्शनर्स संघटनेच्यावतीने श्रध्दांजली सभेचे आयोजन

प्रतिनिधी @ बीड

हाडाचा शिक्षक म्हणून मार्गदर्शन, गरज पडेल तिथे वकीलीचे काम आणि पेन्शनर्ससाठी हाताला धरून योग्य ते सहकार्य, पाठपुरावा करण्याचा सेवाभावी स्वभाव जपणारे स्व.पांडुरंग गोरकर यांचे काही दिवसापूर्वी दु:खद निधन झाले. पेन्शनर्स अॅण्ड सिनीयर सिटीझन संघटनेच्यावतीने त्यांना आज रविवार दि.५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं.५ वा. पेन्शन भवन कार्यालय, सांगली अर्बन बँक, स्टेडीयम रोड बीड येथे भावपूर्ण श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



स्व.पांडुरंग गोरकर सरांनी आपल्या नंतरही आपलं कार्य अखंड सुरू राहावे अशी त्यांची भावना होती आणि तसेच नियोजन ठेवणारे ते होते. त्यांनी घडवलेले विद्यार्थी, आपलं आदर्श, यशस्वी कौटुंबिक आयुष्य, सहवासात आलेले सर्व आणि चांगल्या कार्यासाठी विना मोबदला केलेली वकिली आणि गरजवंतांना तसेच सेवानिवृत्तांना दिलेला मदतीचा हात हा पुढच्या पिढीसाठी देखील खूप मौलिक ठेवा आहे. म्हणून पेन्शनर्स अॅण्ड सिनीयर सिटीझन संघटनेच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करणार आहे. या श्रध्दांजली सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री क्षेत्र लोहगाव पुणे ग्रामस्थांच्यावतीने शिरूर कासार शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला मदत




**आनंद चोरडिया यांचा निस्वार्थपणे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार!**

प्रतिनिधी @ बीड

श्री क्षेत्र लोहगाव पुणे ग्रामस्थांच्यावतीने शिरूर कासार शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किटचे वाटप शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर शहराचे युवक आनंद शेठ चोरडिया यांच्या पुढाकाराने सामाजिक बांधिलकी जोपासत निस्वार्थपणे पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किट वाटप करण्यात आल्या.

मेहबूब भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद शेठ चोरडिया यांनी पुढाकार घेऊन पुणे येथील श्रीक्षेत्र लोहगाव ग्रामस्थ श्री. काळूराम जयवंत साठे, श्री.बाळासाहेब उर्फ सोमनाथ खांडवे, श्री.उमेश खांदवे, श्री.विलास आप्पा खांदवे, श्री.काळे नाना, श्री.बापू गरुड व समस्त ग्रामस्थ यांना विनंती केली त्यांच्या विनंतीला मान देत शिरूर शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किटची मदत करण्यात आली.

# सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उपदान

## अंशदान रक्कम ज्येष्ठता यादीनुसार तात्काळ अदा करा – जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

प्रतिनिधी @ बीड

जिल्हा परिषद बीड अंतर्गत सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची थकित पेन्शन,उपदान व अंशराशीकरण रक्कम साधारणपणे मागील तीन वर्षांपासून अदा करण्यात आलेल्या नसल्याने सेवानिवृत्तामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. करीता प्रहार पेन्शनर सेलचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी व विभागप्रमुख श्री राजेसाहेब चव्हाण, श्री सतीश प्रधान यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब , जिल्हा परिषद बीड यांच्या कडे निवेदनाद्वारे या रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला द्यावेत आणि यासाठी शासनाकडून प्राप्त रक्कम वितरण



करताना सेवानिवृत्त दिनांकानुसार ज्येष्ठता सूची तयार करून अदा करणेबाबत आदेश निर्गमित करण्याची विनंती देखील करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पेन्शन मंजुरी आदेशासोबत उपदान व अंशराशीकरण रक्कम सेवानिवृत्तीच्या दिवशीच धनादेशा द्वारे अदा करून त्यांच्या सेवेचा सन्मान करणे गरजेचे असताना तीन तीन वर्षांपासून याबाबी प्रलंबित आहेत. ही संतापजनक बाब असल्याने व सेवानिवृत्त बांधवांनी या विषयी लक्ष घालण्याची मागणी केली असल्याने प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी व पेन्शनर सेलचे विभाग प्रमुख श्री राजेसाहेब चव्हाण व श्री सतीश प्रधान यांनी हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याचाच एक भाग म्हणून सेवानिवृत्तीच्या दिनांकानुसार ज्येष्ठता यादी बनवून शासनाकडून वेळोवेळी प्राप्त रक्कम अदा करून याबाबत होणारी अनियमितता दूर होण्याच्या दृष्टीने आदेश निर्गमित करण्याची विनंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच दिवाळी सणासाठी अंशराशीकरण व उपदान रक्कम देखील अदा करणेबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे आदेश शिक्षण विभागाला देण्याची मागणी प्रहार पेन्शनर सेलने केली आहे. प्रहार पेन्शनर सेल यासाठी राज्य स्तरावर शासनाकडे देखील निवेदने व प्रत्यक्ष भेटून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करत आहे. याप्रसंगी प्रहार सेवानिवृत्त विभागाचे पदाधिकारी सर्वश्री अशोक गोरे , संजय पाटील, पाळवदे सर, सावंत सर , निर्मलाताई वाघमारे, रेखाताई जाधव इत्यादी उपस्थित होते.



बीड – येथील जिल्हा माहिती कार्यालयामध्ये एमपीएससी अंतर्गत वर्ग तीन या पदासाठी पात्र ठरलेल्या बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथील कृष्णा डोईफोडे यांना जिल्हा प्रशासनाने नियुक्तीचे आदेश दिले. जिल्हा माहिती कार्यालयात रुजू झाल्यानंतर त्यांचा दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने पेन भेट देऊन स्वागत करताना संपादक वैभव स्वामी सह जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद...

# गोरक्षनाथ टेकडीवर राजेंद्र महाराज चोरडिया यांचे कीर्तन

प्रतिनिधी @ बीड

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दुसऱ्या पुण्यतिथी आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी (ता. जि. बीड) येथे धार्मिक वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणून मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया



(संभाजीनगर) यांचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाद्वारे संत विचारांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

पुण्यतिथी निमित्त सकाळी ८ वाजता बाबांचा पालखी सोहळा निघणार असून, सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणा पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी समस्त गावकरी देवळा यांनी पुढाकार घेतला आहे.या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतकृपेचा लाभ घ्यावा, असे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ महाराज यांनी आवाहन केले आहे.




आतुल आनील गायकवाड याना नियुक्ती पत्र देता नवनित कावत साहेब .जाल्हा अभियान व्यवस्थापक मुरहारी सावत उमैद

# जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## विद्यार्थ्यांकडून घेतली फार्मासिस्टची शपथ,आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद




प्रतिनिधी @ बीड

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य एज्युकेशन ग्रुपतर्फे आदित्य फार्मसी कॉलेजच्या सभागृहात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय क्षेत्रात फार्मासिस्टची भूमिका, औषधांचा नैतिक आणि तर्कसंगत वापर तसेच फार्मसी क्षेत्रातील व्यापक संधी या विषयांवर हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून फार्मासिस्टची शपथ घेण्यात आली. आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे म्हणले डॉक्टर हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ असले तरी फार्मासिस्ट हे असे व्यावसायिक आहेत जे त्या आधारस्तंभाला बळ देतात. औषधांचा नैतिक वापर आणि रुग्णांच्या हिताचा विचार ही फार्मासिस्टची खरी जबाबदारी आहे. आजच्या काळात फार्मसी क्षेत्राची व्याप्ती रेल्वे बोर्ड, लोकसेवा आयोग तसेच विविध सरळसेवा भरती मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासन, बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आदित्य एज्युकेशन ग्रुपचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे विशेष प्रोत्साहन लाभले. औषधनिर्माण संस्थेचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, आदित्य इंजिनीरिंग कॉलेज चे प्राचार्य डॉ.बहादुरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. राहुल खडके, आदित्य डी.एड. कॉलेजच्या प्राचार्या बावणे मॅडम यांच्यासह आदींची उपस्थित होती.

डॉ. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना फार्मसी पदवीमुळे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी अचूक रणनीती आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षांसाठी महाविद्यालयात पूरक वर्ग सुरू करण्याचे आश्वासन दिले.

### विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य एज्युकेशन ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांची दंत तपासणी शिबिर, बीएमआय तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरांना विद्यार्थ्यांसह उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या वतीने विद्यार्थांच्या शिक्षणाबरोबर त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेण्यात आली.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ज्येष्ठ नागरिक समाजाचा कणा आहे : मा. श्याम मोरे



प्रतिनिधी @ गेवराई

जागतिक ज्येष्ठ दिन मोठ्या आनंदात ,उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्याम मोरे उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग गेवराई यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्याम मोरे यांचा सत्कार बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था अध्यक्ष तसेच गेवराई मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख मा. अनिल बोर्डे यांनी केला. त्यानंतर प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सर्व ज्येष्ठ नागरिक यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर मराठवाडा विकास आंदोलनात कारावास झालेले अंकुश दाभाडे यांचा प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल बोर्डे यांनी केले. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी आपण संघटित असणे गरजेचे आहे. संघटित असल्यास आपल्या मागण्या पूर्ण होऊ शकतात. तसेच ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा आधारस्तंभ आहे कारण की त्याच्या येणाऱ्या पिढीला उपयुक्त ठरत असतात आपण समाजासाठी काम केल्यास समाज मानसन्मान देत असतात. ज्येष्ठ नागरिकाच्या अनुभवाचा व अभ्यासाचा फायदा समाजाला होणे आवश्यक आहे. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्याम मोरे उप कार्यकारी अभियंत उपविभाग गेवराई यांनी आपले विचार अथवा मार्गदर्शन करताना असे म्हणाले आहे की, ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा कणा आहे. ज्येष्ठ नागरिकाच्या अनुभवामुळे अनेक गोष्टी सुलभ होत आहे. ज्येष्ठ नागरिकांना आपण सन्मान देणे आवश्यक आहे. तसेच त्यांना सुख सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गेवराई तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्र प्रा. फलक भानुदास यांनी केले यांनी केले त्यांनी असे म्हटले की, ज्येष्ठांना तरुण पिढी कडून कोणतीही अपेक्षा नसते फक्त त्यांना स हृदयाने सन्मान ही अपेक्षा असते. ज्येष्ठ नागरिक ही अनुभवाची शिदोरी असते त्या शिदोरीचा वापर आपल्यासाठी नक्कीच होईल त्यानंतर प्रमुख पाहुणे मा. उपकार्यकारी अभियंता उप विभाग गेवराई श्याम मोरे यांच्या गुणाची ओळख करून दिली कोणताही व्यक्ती कार्यालयात त्यांची प्रश्न घेऊन आल्यास संवाद साधत असतात त्यातून प्रश्न मार्गी लावत असतात. आतापर्यंत कालावधीमध्ये सदरील कार्यालयात कोणताही अभियंता टिकून राहिलेला नाही. परंतु श्याम मोरे यांच्या कौटुंबिक अडचणीमध्ये अनेक प्रकारची प्रसंग आले आहेत. त्यांची सेवा पारदर्शकपणे करीत आहेत. बीड जिल्हा विकास आंदोलनात गेवराई तालुक्याचा मोठ्या प्रमाणात सहभाग असून आम्ही प्रत्यक्षात आंदोलनात १९७४ मध्ये बीड येथे गेवराई येथील बहुसंख्य कार्यकर्ते बीड येथील मोर्चामध्ये सामील झाले होते. बीडला रेल्वे आलीच पाहिजे घोषणाने बीड शहर दणाणून सोडले होते. गेवराई शहरातील मोर्चामध्ये अंकुश दाभाडे सहभागी झाले होते. त्या वेळेस त्यांना करावास झाला होता. त्यावेळी आम्ही मोर्चात सहभागी होतोत असे अनिल बोर्डे यांनी आपल्या विचारात व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे ,उपाध्यक्ष गणेश रामदासी, ॲड बी एम मुळे, प्रमोद कदम राजेंद्र सुतार, वायचळ चपळगावकर कैलास मडकर वल्लभ तौर, पांगरे तात्या इत्यादी ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. त्यानंतर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. भानुदास फलके यांनी केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी श्याम मोरे यांनी अमूल्य वेळ देऊन उपस्थित राहिले ज्याच्यासाठी कार्यक्रम आयोजन करण्यात करण्यात आले होते ते संपूर्ण ज्येष्ठ नागरिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते त्यामुळे सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच नेहमीच कोणताही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्याची संपूर्ण नियोजन करण्या साठी घराची अनेक जबाबदारी असताना ज्येष्ठ नागरिक निर्मला केंद्रप्रमुख व मार्गदर्शक श्री अनिल बोर्डे यांचे सर्वांनी कौतुक आणि आभार मानले.



# आम आदमी पार्टी केज तालुका कार्यकारिणी जाहीर

## अड.दिनेश बिक्कड तालुकाअध्यक्ष तर ईश्वर सारुक यांची उपाध्यक्ष म्हणून निवड

प्रतिनिधी @ केज

आम आदमी पार्टीच्या बीड जिल्हा पातळीवरील संघटने च्या बळकटीसाठी आणि पक्षप्रमुख श्री. अरविंद केजरीवाल यांच्या विचारसरणीने प्रेरित होऊन,तसेच महाराष्ट्र राज्याचे कार्यकारी अध्यक्ष श्री. अजित फटके पाटील यांच्या आदेशानुसार, केज तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.तालुकाअध्यक्ष अड. दिनेश बिक्कड, उपाध्यक्ष ईश्वर सारुक, सचिव विजय वनवे,सह सचिव अक्षय शाहरुख, मीडियाप्रमुख शशिकांत आंधळे,संघटनमंत्री अमोल वनवे,सहसंघटन मंत्री वैभव चाटे,अल्प संख्याक विभाग प्रमुख आबा हाके,शेतकरी आघाडी प्रमुख श्रीनाथ बिक्कड,विद्यार्थी आघाडी प्रमुख अमोल देशमुख यावेळी आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, जिल्हा उपाध्यक्ष रफिक पठाण व जोशी,बीड शहरप्रमुख सय्यद सादेक,अल्पसंख्याक विभाग प्रमुख नासेर मुंडे,मीडिया प्रमुख रामभाऊ शेरकर,तसेच बाजीराव ढाकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.केज तालुक्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये आम आदमी पार्टी प्रभावी पणे सर्वसामान्यांचे प्रश्न

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी @ पाटोदा

आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जेद्वारे सातत्यपूर्ण आणि शाश्वत वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन प्रमुख उपकेंद्रांवर ५ चत-क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत.शेतकरी व नागरिकांतून आनंद उत्सव साजरा करत राज्य सरकार व आ.सुरेश धस यांचे आभार मानले.या मंजुरीनंतर रोहतवाडी ३३ के. व्ही. उपकेंद्र, रोहतवाडी आणि ३३ के. व्ही. उपकेंद्र, डोंगरकिन्ही येथे कामे मोठ्या वेगाने सुरू झाली आहे.या कामांमुळे शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सौर ऊर्जेद्वारे शेती सिंचनासाठी स्थिर, विश्वासार्ह आणि शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादनात वाढ, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. या यशाबद्दल बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण आणि ऊर्जेच्या स्थिर पुरवठ्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील आहे. या दोन उपकेंद्रांच्या मंजुरीमुळे मतदारसंघातील अनेक गावांना दीर्घकालीन लाभ होणार असून हे काम म्हणजे शेतकऱ्यांसाठी



मिळवलेले एक ठोस यश आहे.

रोहतवाडी उपकेंद्रांतर्गत नायगाव, रोहतवाडी,जवळला,थेरला, करंजवन, डोंमरी,कोल्हेमानेवस्ती,भुसारनारवाडी, तिरमलावाडी, भगताचे कोठे,घाटेवाडी, वडझरी,हनुमानवाडी, मळफाचीवाडी,पिठ्ठी, उखांडा या गावांचा समावेश आहे, तर डोंगरकिन्ही उपकेंद्रांतर्गत डोंगरकिन्ही, नाळवंडी, जाटनांदूर, मळेकरवाडी, मांडवेवाडी, तुपेवाडी, मुंजारवस्ती,मिसाळवाडी,मोरजळवाडी, भाटेवाडी, कारेगाव, पोटेवाडी,भराटवाडी, जाधववाडी,घोळेवाडी,सवसवाडी,मद्मापुरी आणि जेबेवाडी ही गावांना फायदा होणार होणार आहे.या योजनेच्या माध्यमातून आष्टी विधानसभा मतदारसंघात सौर ऊर्जेवर आधारित कृषी क्रांती घडविण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याचे शेतकरी व स्थानिक नागरिकांकडून भावना व्यक्त होत आ.सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे.

# गुत्तेदाराच्या ढिसाळ कारभारामुळे लाईटचा लोखंडी पोल अंगावर पडल्याने नाव्होलीच्या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील नाव्होली गावातील सर्वोपरीचीत शेतकरी बाबासाहेब बिक्कड (सावकार) यांच्या अंगावर गुत्तेदाराच्या ढिसाळ कारभारामुळे लाईटचा लोखंडी पोल पडून त्यांचा उपचारा दरम्यान दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली असुन त्यांच्या निधनाने नाव्होली गावात आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील नाव्होली येथील व्यवसायाने शेतकरी असणारे बाबासाहेब दादाराव बिक्कड वय अंदाजे ५५ वर्ष हे दि.२ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी दसरा सणादिवशी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गावातुन नांदूर केज रस्त्याने आपल्या घरी येत होते.त्याच दिवशी सकाळपासूनच गावापासून ते



बाबासाहेब दादाराव बिक्कड हे रहात असलेल्या येडझनी वस्ती पर्यंत महावितरण कंपनीचे राजेगाव सब स्टेशन अंतर्गत गावठाण सिंगलफेज लाईटचे लोखंडी पोल रोवण्याचे काम गुत्तेदारामार्फत सुरू होते.सांयकाळी अंदाजे ५ वाजण्याच्या सुमारास बाबासाहेब बिक्कड हे गावाकडून येडझनी वस्तीवर असलेल्या आपल्या घराकडे येत होते.मात्र वाटेतच पोल रोवत असलेले पाहून रोडवर त्यांनी आपल्या शेतातुन काढून आणलेल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्या जवळ काही वेळ ऊभे राहिले.असताना त्या ठिकाणी रोवण्यासाठी आणलेला लोखंडी पोल रोडच्या या बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नेत असताना ट्रॅक्टरला लोखडी साखळीने लटकलेल्या पोलची साखळी तुटली आणि वर लटकलेला लोखंडी पोल रस्त्याच्या कडेला आपल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्याजवळ उभे असलेले बाबासाहेब दादाराव बिक्कड यांच्या डोक्यात पडला त्यात त्यांच्या डोक्याला पायाला गंभीर मार लागल्याने त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी दाखल केले असता उपचार सुरू असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला हि घटना सायंकाळी घडल्याने आणि त्या दिवशी दसरा सण असल्याने सिमोलंघना च्या तयारीत असणारे सारे गाव मृत्यूचीमाहिती मिळताच स्तब्ध झाले. त्यामुळे गावात सिमोलंघन झालेच नाही रात्रीची वेळ असल्याने त्यांचे शवविच्छेदन दुसऱ्या दिवशी सकाळी झाल्याने त्यांच्या पार्थिवावर दि.३ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी १वाजता त्यांच्या शेतात हजारोच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ आप्तेष्ट, मित्रपरिवार,सामाजिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रा तील चाहते अंत्यविधी साठी उपस्थित होते. बाबासाहेब बिक्कड यांना सावकार या नावाने सर्वत्र ओळखले जात होते.त्यांचा चाहता वर्ग मोठा होता.तसेच त्यांना धार्मिक वारकरी सांप्रदायिक कार्याची खुप आवड होती.या त्यांच्या जाण्याने नाव्होली गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात भाऊ,पत्नी चंद्रकला,दोन मुले बालाजी आणि प्रदिप तर मुलगी सुरेखा (विवाहित)जावाई,सुना

# आंतरराष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेसाठी डॉ.संतोष कदम यांची निवड

## दुबईत होणाऱ्या ४५ वर्षांवरील व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

दुबई मुहसिंहा येथील इनडोअर स्टेडियम मध्ये १८ ते २३ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी अंबाजोगाई येथील योगेश्वरी क्रीडा मंडळाचे खेळाडू डॉ.संतोष कदम यांची भारतीय संघात



निवड झाली आहे. दुबई येथे होणाऱ्या या मास्टर्स आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतासह स्पेन,पोलंड, युएई, पाकिस्तान, फिलिपाईन्स, नेपाळ व युरोपियन युनियन संघाचा समावेश असणार आहे.पुणे येथे झालेल्या मास्टर्स व्हॉलीबॉल स्पर्धेतून संतोष कदम यांची निवड झाली आहे.या संघात महाराष्ट्रासह केरळ,कर्नाटक,दिल्लीच्या खेळाडूंचा समावेश आहे.यापूर्वी त्यांनी अनेकवेळा राष्ट्रीय व राज्य स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून राज्य व विद्यापीठ संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. अश्वमेध क्रीडा स्पर्धेतील पहिले उत्कृष्ट खेळाडू आहेत. महाराष्ट्र संघाचे व विद्यापीठाचे प्रशिक्षक व निवड समिती सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या निवडीचे कौतुक योगेश्वरी क्रीडा मंडळाचे सर्व सभासद यांच्यासह व्हॉलीबॉल खेळाडूंनी केले आहे.

# पाटोदा ते शंभरचिरा रोड ६.६१ कोटींचे बोगस काम ॲड. एन एल जाधव यांच्या तक्रारीनंतर

## पुन्हा नव्याने दर्जेदार व मानकाप्रमाणे काम गुत्तेदाराकडून करून घेण्याचे कार्यकारी अभियंता यांचे आश्वासन

प्रतिनिधी @ पाटोदा

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत चठङ ०१ राष्ट्रीय महामार्ग ५६१ जवळाला फाटा ते पाटोदा या ५.३ किलोमीटर रस्त्याचे (एकूण खर्च ६६१.११ लक्ष रुपये) काम दर्जाहीन व अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याची गंभीर तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी केंद्र व राज्य सरकारकडे ३ सप्टेंबर २०२५ रोजी केली होती.

काय होती तक्रार ?

रस्ता काम इस्टिमेट व इंडेक्स प्रमाणे झालेले नाही.

ऋकाम सुरु असतानाच अनेकवेळा नागरिक व माध्यमांनी निष्कृष्ट दर्जाबाबत तक्रारी नोंदवल्या होत्या. त्यासंदर्भात त्रेस्रश्रश ऋझड फोटो, वृत्तपत्रातील बातम्या, ग्रामस्थांची निवेदने व खासदारांची तक्रार हे पुरावे सरकारकडे सादर करण्यात आले असताना देखील काहीच कारवाई झाली नाही.सदरील काम हे राजकीय पाठिंबा असणाऱ्या ठेकेदाराला करण्यासाठी दिल्यामुळे संबंधित ठेकेदार यांनी अंदाजपत्रिका प्रमाणे काम न करता रस्ता न खोदता खालच्या खडीवर मुरूम टाकून कसलाही भर न टाकता काम सुरू केले व जुना रस्ता न खोदता आजूबाजूची खडी ओढून निष्कृष्ट दर्जाचे काम केले आहे. सदरील संपूर्ण कामाची त्रयस्थ वरीष्ठ विभागीय गुण नियंत्रकांकडून नागरीका समक्ष गुण पडताळणी करावी व दर्जाहीन काम करणारा ठेकेदार व जबाबदार अधिकारी यांच्याकडून झालेली नुकसान भरपाई घ्यावी व त्यांच्यावर फौजदारी गुन्हे



दाखल करावे. रस्त्याचे काम अंदाजपत्राकाप्रमाणे करून जनतेला दर्जेदार रोड करून द्यावा. शेजारचाच बीड-आहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग पाच वर्षांपूर्वी डांबरीकरण झाला असून, त्यालाही तेव्हढ्याच अतिवृष्टीचा सामना करावा लागला तरी तो अबाधित आहे. मग झचऋडध अंतर्गत झालेला रस्ता एवढ्या लवकर का खराब झाला?✻ कामात गंभीर गैरव्यवहार झाला असून, सहा कोटी रुपयांचा जनतेचा निधी वाया गेला आहे.

संबधित अधिकाऱ्याने त्याच्या कर्तव्यामध्ये कसूर केला असल्याचे उघड.✻ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून गुणवत्ता व परिणामाची ४ वेळा तपासणी झाल्याचे सांगितले आहे त्यानंतर अवघ्या एका महिन्यातच सर्व रस्ता उखडला याचा अर्थ गुणवत्ता तपासणी अहवाल खोटे दिले.✻ संबंधित अधिकाऱ्यांनी ऋदि.०९.०७.२०२५ रोजी च्या सविस्तर व पुराव्यासह दिलेल्या तक्रारिची दखल घेतली नाही.✻ ऋसदरील काम अतिशय निष्कृष्ठ असताना देखील झालेल्या कामाबाबत समाधानकारक शेरे प्राप्त आहेत असे सांगून अधिकाऱ्याकडून ठेकेदाराची पाठराखण करण्यात आली होती.ग्रामविकास मंत्रालय यांचे निर्देशाने कार्यकारी अभियंता बीड यांचे आश्वासन

ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी संबंधितावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे ड. नरसिंह जाधव यांना पत्राद्वारे कळविले होते. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता बीड यांनी सध्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे काम करणे शक्य नाही, पाऊस थांबल्यानंतर काम करण्याची परिस्थिती निर्माण झाल्या नंतर सदर रस्त्याचे मानकाप्रमाणे दर्जेदार काम करून देण्यात येईल तदनंतर त्रयस्थ यंत्रणेद्वारे राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून तपासणीनंतर देयक अदा करण्यात येईल असे कळविले आहे.वरील आश्वासनानंतर प्रत्यक्ष इस्टीमेट प्रमाणे दर्जेदार काम न केल्यास लोकशाही मार्गाने व कायदेशीर मार्गाने पाटोद्यातील जनतेच्या वतीने लढा चालू ठेवणार असे ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी सांगितले.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत चठङ ०१ राष्ट्रीय महामार्ग ५६१ जवळाला फाटा ते पाटोदा या ५.३ किलोमीटर रस्त्याचे (एकूण खर्च ६६१.११ लक्ष रुपये) काम दर्जाहीन व अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याची गंभीर तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी केंद्र व राज्य सरकारकडे ३ सप्टेंबर २०२५ रोजी केली होती.




# केज येथे गंगामाऊली शुगर मार्फत ऊस पिक परिसंवाद संपन्न

प्रतिनिधी @ केज

केज येथे गंगामाऊली शुगर या कारखान्याच्या मार्फत कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पुर्वहंगामी ऊस लागवड पद्धतीमुळे ऊस उत्पादनात होणारी वाढ या बाबत माहिती देण्या करीता कृषिभुषण सन्मानित श्री.पांडुरंग आबा आवाड रा. आवाड शिरपुरा यांचे पुर्व हंगामी व सुधारीत ऊस जातींची लागवड पर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.या चर्चासत्र कार्यक्रमात श्री.पांडुरंग आबा आवाड यांनी शेतकऱ्यांना पुर्व हंगामी ऊस लागवडी करीता जमीनीची पुर्व मशागत, लागवड हंगाम,सुधारीत ऊस जाती,सरीतील अंतर,खत व्यवस्थापन, एकात्मीक रोग व किड व्यवस्थापन या बाबत सखोल मार्गदर्शन केले. या चर्चासत्रास मस्साजोग,सांगवी, सारणी,पिंपळगव्हाण, शिंदी,काळेगाव, आरणगाव,जाधव जवळा,कोरेगाव, सावंतवाडी,डोनगाव, सारणी आनंदगाव, सोनीजवळा,चिंचोली माळी,हादगाव,डोका व कारखाना परिसरातील शेतकऱ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला.या चर्चासत्रास गंगामाऊली शुगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.बी.आय. मुजावर,मुख्य शेतकी अधिकारी श्री.अविनाश आदनाक,ऊस विकास अधिकारी,ऊस पुरवठा अधिकारी व शेतकी विभागातील सर्व कर्मचारी या उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.वसंत गायकवाड वप्रास्तावीक मुख्य शेतकी अधिकारी श्री.अविनाश आदनाक यांनी केले.यामध्ये त्यांनी प्रमुख मार्गदर्शक पांडुरंग आबा आवाड यांची ओळख व त्यांनी केलेले ऊस शेतीतील सुधारीत प्रयोग या बाबत सखोल माहिती दिली.आभार प्रदर्शनाने चर्चासत्राची सांगता झाली.

# विविध शैक्षणिकउपक्रम राबवून विद्यार्थी गुणवत्ता वाढवावी-केंद्रप्रमुख सुरेश करांडे

**प्रतिनिधी @ वडवणी**



शनिवार, दि. ०४/१०/२०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,साळिंबा या ठिकाणी वडवणी केंद्राची तिसरी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाली.या परिषदेचे उद्घाटन वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.या परिषदेला केंद्रप्रमुख श्री धायतिडक साहेब,केंद्रीय मुख्याध्यापक श्री देशमुख साहेब,साळिंबा गावचे सरपंच श्री दिनेश नाईकवाडे साहेब,शा.व्य.स.अध्यक्ष श्री.सतिशजी खाडे साहेब,श्री.ह.भ.प.हरिदास महाराज सोळंके सर, शिक्षणप्रेमी श्री अंबादासजी जाधव साहेब, तज्ञ मार्गदर्शक श्री डोरले सर आणि श्री राठोड सर ( मु.अ.साळिंबा ) इत्यादी मान्यवर उपस्थित होते......त्याच प्रमाणे केंद्र वडवणी अंतर्गत सर्व शाळांचे मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक बंधू-भगिनीं यांची या परिषदेला उपस्थिती लाभली. परिषदेची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली.या परिषदेसाठी केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब अध्यक्ष भुषविले.त्यानंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.इयत्ता वी च्या विद्यार्थ्यीनींनी घ-ठ-जघ ढठ-उघ वर स्वागतम...सुस्वागतम.. .हे गीत गायण करून मान्यवरांचे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे शब्द-काव्य पुष्पांनी स्वागत केले.तदनंतर वडवणी केंद्रातून बदली होऊन इतर ठिकाणी गेलेल्या शिक्षक बंधू-भगिनींना मान्यवरांच्या हस्ते शाल आणि झाड देऊन निरोप देण्यात आला. त्याचप्रमाणे इतर केंद्रातून वडवणी केंद्रातील शाळांमध्ये नवीन रुजू झालेल्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे मान्यवरांच्या हस्ते सऱ्हदय शाल, पुष्पगुच्छ आणि झाड देऊन स्वागत करण्यात आले.त्या नंतर केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांनी शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक केले. प्रस्ताविकेत माननीय गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे साहेब यांच्या शैक्षणिक उपक्रमाविषयी माहिती सांगितली विविध उपक्रम राबवून विद्यार्थी गुणवत्ता वाढवण्याबाबत शिक्षकांना आव्हान करण्यात आले काही शासकीय महत्वाच्या विषयाला ओघवता स्पर्श केला.तदनंतर श्री डोरले सर यांनी आपली तासिका,खान अकॅडमी पोर्टल नोंदनी व माहिती दिली.त्याचप्रमाणे श्री राठोड सर यांनी जयंत नारळीकर विज्ञान व गणित समृद्धी कार्यक्रम _या संदर्भात इत्यंभूत माहिती आपल्या तासिकेच्या माध्यमातून दिली श्री राठोड सर यांनी प्रोजेक्टर च्या माध्यमातून काही महत्वाच्या संकल्पना समजाऊन सांगितल्या.या सर्व कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन श्री खाटवकर सर यांनी केले.तर कार्यक्रमाचे आभार श्री शिंदे सर यांनी माणले.या शिक्षण परिषदेचे आयोजन आणि सौजन्य प्रा.शा साळिंबा, प्रा.शा.मामला आणि प्रा.शा.सौंदडवस्ती यांनी पार पाडले.या परिषदेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर,यंदे सर,शिंदे सर,श्रीम.देखणे मॅडम,अर्जुन शिंदे सर,सोळुके सर,चिबडे सर,श्रीम.सांगळे मॅडम आदी सर्वांनी परिश्रम घेतले.शेवटी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने या शिक्षण परिषदेची सांगता करण्यात.शिक्षण परिषदेमध्ये निरोप आणि स्वागत समारंभ हा भावस्पर्शी ठरला...एकंदरीत या कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणि समाधान दिसत होते.



# कन्या प्रशाला आष्टीची प्राजक्ता माने बनली ग्राम महसूल अधिकारी

**प्रतिनिधी @ आष्टी**

पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या शाळेची विद्यार्थिनी प्राजक्ता संजय माने ही शालेय जीवना पासुन एक हुशार व अभ्यासु विद्यार्थिनी होती. तिची जिद्द अधिकारी होण्याची होती. तिने आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून पुण्यासारख्या शहरात कॉम्प्युटर इंजिनिअरिंग देखील केली.

याबरोबर ती स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करत होती. स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करत असताना ग्राम महसूल अधिकाऱ्याची परीक्षा दिल्यानंतर ती चांगल्या मार्कसने उत्तीर्ण झाली. आज ती पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील शिरसाटवाडी या भागात ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत आहे. प्राजक्ता संजय माने ही आष्टी येथील व जामखेड येथे ल. ना. महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणारे संजय माने यांची कन्या आहे. शिरसाटवाडी येथील ग्रामस्थांनी तिचा आदरपूर्वक सत्कार करून तिला सन्मानित केले. तिच्या हस्ते महसूल कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. प्राजक्ता संजय माने हिच्या यशाबद्दल आ. सुरेश आण्णा धस, माजी आ. साहेबराव दरेकर नाना तसेच आष्टी नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे, कन्या प्रशालेच्या शिक्षिका श्रीम. आशाताई धोंडे, श्रीम. जयश्री काकडे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी अभिनंदन केले आहे.

# हळद गायब करून व्यापाऱ्याला ३७ लाखांचा गंडा

## ट्रकभर हळद गायब करून व्यापाऱ्याला ३७ लाखांचा गंडा ट्रकचालक आणि मालकावर अंबाजोग गुन्हा

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

अंबाजोगाई येथून सांगलीला नेण्यासाठी ३० टन हळद दिली असता ट्रकमधील तब्बल ३७ लाख ८१ हजार रुपयांची हळद लंपास करून खोटी तक्रार दाखल करणाऱ्या ट्रक मालक आणि चालकावर अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लोखंडी सावरगाव कळंब फाटा परिसरात घडली.

फिर्यादी प्रितेश दुर्गाप्रसाद सोनी हे छत्रपती संभाजीनगर येथील हे दुर्वा कमोडीटी प्रा. लि. या कंपनीचे संचालक असून, ते सांगली येथे हळद दळून विक्री करतात. त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी राधा सर्वेश्वर कंपनी सोलापूरमार्फत ३० टन हळद खरेदी करून स्टार ग्रो वेअरहाऊस, लिंबाळा (एमआयडीसी, हिंगोली) येथून सांगलीकडे पाठवण्यासाठी ट्रक क्रमांक एमएच २६ एडी २९३५

या वाहनाद्वारे वाहतूक ठरवली होती.

ट्रक मालक नदीम खान मुजाहेद खान (रा. अपना कॉर्नर, परभणी) आणि चालक सय्यद अजगर सय्यद सज्जान (रा. दर्गारोड, परभणी) यांच्याकडे माल ताब्यात देण्यात आला. मात्र, सांगलीला पोहोचण्या आधी नदीमने सोनी यांना कळवले की अंबाजोगाई जवळ कळंब फाटा येथे अज्ञात लोकांनी ट्रक लुटल्याची घटना घडली आहे. त्यानंतर सोनी घटनास्थळी पोहोचले असता ट्रकमध्ये फक्त ३० पोते शिल्लक असून उर्वरित ५७० पोते हळद गायब असल्याचे दिसून आले.




चौकशीत चालक सय्यद अजगरने कबुली दिली की ट्रक कोणत्याही चोरट्यांनी चोरलेला नसून ट्रक मालक नदीम खान यांनी संगनमत करून ट्रकमधील हळद कोठेतरी विल्हेवाट लावली व पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दिली.या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम ३१६ (२), ३१६ (३), ३१८ (४), २१७, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन नवीन ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर मंजूर

**प्रतिनिधी @ आष्टी**



आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जेद्वारे सातत्यपूर्ण आणि शाश्वत वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन प्रमुख उपकेंद्रांवर ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. शेतकरी व नागरिकांतून आनंद उत्सव साजरा करत राज्य सरकार व आ. सुरेश धस यांचे आभार मानले.

या मंजुरीनंतर रोहतवाडी ३३ के. व्ही. उपकेंद्र, रोहतवाडी आणि ३३ के. व्ही. उपकेंद्र, डोंगरकिन्ही येथे कामे मोठ्या वेगाने सुरू झाली आहे. या कामांमुळे शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सौर ऊर्जेद्वारे शेती सिंचनासाठी स्थिर, विश्वासार्ह आणि शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादनात वाढ, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. या यशाबद्दल बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण आणि ऊर्जेच्या स्थिर पुरवठ्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील आहे. या दोन उपकेंद्रांच्या मंजुरीमुळे मतदारसंघातील अनेक गावांना दीर्घकालीन लाभ होणार असून हे काम म्हणजे शेतकऱ्यांसाठी मिळवलेले एक ठोस यश आहे.

रोहतवाडी उपकेंद्रांतर्गत नायगाव, रोहतवाडी, जवळला, थेरला, करंजवन, डोंमरी, कोल्हेमानेवस्ती, भुसारनारवाडी, तिरमलावाडी, भगताचे कोठे, घाटेवाडी, वडझरी, हनुमानवाडी, मळफाचीवाडी, पिठ्ठी, उखांडा या गावांचा समावेश आहे, तर डोंगरकिन्ही उपकेंद्रांतर्गत डोंगरकिन्ही, नाळवंडी, जाटनांदूर, मळेकरवाडी, मांडवेवाडी, तुपेवाडी, मुंजारवस्ती, मिसाळवाडी, मोरजळवाडी, भाटेवाडी, कारेगाव, पोटेवाडी, भराटवाडी, जाधववाडी, घोळेवाडी, सवसवाडी, मदमापुरी आणि जेबेवाडी ही गावांना फायदा होणार होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून आष्टी विधानसभा मतदारसंघात सौर ऊर्जेवर आधारित कृषी क्रांती घडविण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याचे शेतकरी व स्थानिक नागरिकांकडून भावना व्यक्त होत आ. सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे.

# लोकमान्य टिळक विद्यालयात विशाखा समितीच्या वतीने 'जागर स्त्री शक्तीचा' कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**




पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात विशाखा समितीच्या वतीने शारदोत्सवा निमित्त दि.०४ ऑक्टोबर २०२५ शनिवार रोजी 'जागर स्त्री शक्तीचा' कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुणराव पत्की तर प्रमुख मार्गदर्शिका म्हणून राष्ट्र सेविका समितीच्या अभिलेखागार श्रीमती.शरयुताई हेबाळकर आणि समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्तृत्ववान महिला यांची उपस्थिती होती.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व भारतमाता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक अरुणराव पत्की यांच्या हस्ते श्रीमती. हेबाळकर यांचा शाल,पुष्प आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच श्रीमती.शरयुताई हेबाळकर यांच्या हस्ते पोखरी गावातील कर्तृत्ववान महिला ज्यामध्ये आरोग्य सेविका श्रीम.वनमालाताई बनाळे,आशा वर्कर श्रीम.जयश्रीताई साळवे ,ग्रामपंचायत सदस्या श्रीम.सुशीलताई निकम,शेख शैनाबी,अंगणवाडी सेविका श्रीम.मीनाताई निकम तसेच श्रीम.रुक्मिणीबाई लाड व श्रीम.संगीताताई तेलंग यांचा शाल,पुष्प व पुस्तिका देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी इ.८वी व ९वीतील विद्यार्थिनींनी शैलपुत्री,ब्रम्हचारिणी,चंद्रघंटा,कृष्णमुंडा,स्कंदमाता,कात्यायनी,काळरात्री,महागौरी आणि सिद्धीदात्री या देवींच्या विविध ९ रूपात वेशभूषेसह देवीचे महात्म्य सांगितले. स्त्री शक्तीचा जागर याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीम.हेबाळकर यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगातून त्यांचे कर्तृत्व,दातृत्व आणि नेतृत्व याचे महत्व सांगितले.स्वतःच्या कामात प्रामाणिक राहून आणि निर्मळ मनाने केलेले कार्य सदैव सत्कारणी लागते याची प्रचिती अहिल्यादेवींनी केलेल्या कामातून मिळते असे विचार मांडत त्यांनी विद्यार्थिनींना राष्ट्र सेविका समितीच्या अंतर्गत मन, मनगट आणि बुद्धीच्या बळकटी साठीचे केले जाणारे कार्य याची सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.९वीतील कु.प्रिया बळवंत,प्रास्ताविक कु.अक्षरा नेवल,स्वागत,परिचय श्रीम.प्रणिता धोंड आणि आभारप्रदर्शन कु.प्रगती निकम (८वी) यांनी केले.कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक,कर्मचारी यांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाखा समितीच्या सदस्या श्रीम.पल्लवीताई कुलकर्णी व श्रीम.प्रणिता धोंड यांनी विशेष परिश्रम घेतले.



# जिल्हा परिषद कोठारबन शाळेतील तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत खेळाडुचा दणदणीत विजयी

**प्रतिनिधी @ वडवणी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठारबन शाळा चा तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा त यश प्राप्त केल्या बद्दल गावातून खेळाडू ची मिरणूक काढण्यात आली.वडवणी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठारबन शाळेचे विद्यार्थी खेळाडू सौम्य जालिंदर भस्करे ६०० मी. धावणे प्रथम क्रमांक* समृद्धी सुधाकर मुंडे लांबउडी प्रथम क्रमांक अविनाश विष्णू मुंडे लांबउडी प्रथम क्रमांक रुद्राक्ष सूर्यकांत मुंडे गोळाफेक प्रथम क्रमांक व थाळीफेक द्वितीय क्रमांक साक्षी दिनकर मुंडे गोळफेक द्वितीय क्रमांक आदर्श राजेभाऊ डोंगरे गोळाफेक द्वितीय क्रमांक या खेळाडूंना यशमिळवले आहे. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी श्री. उजगरे साहेब, केंद्रप्रमुख श्री. सुनिलभाऊ मुंडे, शाळेचे मुख्याध्यापक, श्री तिडके पी .एल ,श्री आळणे डी .आर, धाईतिडक आर .आर, श्री टिपरे डी .जी ,श्री कुरकुटे पी .के., कोकणे बी .आर, श्री ए. ए .जाधव श्रीमती, ठोकरे मॅडम श्रीमती, सोनटक्के मॅडम, श्री राठोड सर ,सर्व शिक्षक वृंद, सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष कोठारबन व गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक यांनी स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन केले

# विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांसाठी तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेतर्फे आदर्श पुरस्कार - दादा पवळ

**प्रतिनिधी @ आष्टी**

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेच्या वतीने आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक स्वास्थ्य सुदृढ राहावे व आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत असलेल्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे म्हणून हे पुरस्कार देण्यात येणार आहेत.



आष्टी तालुक्यातील सर्व धर्माच्या व जातीच्या व्यक्तीं या पुरस्कारासाठी पात्र राहतील असे ज्येष्ठ पत्रकार ड. सीताराम पोकळे यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे. आष्टी तालुक्याच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीसाठी हे पुरस्कार देण्यात येतील. सामाजिक कार्य, कृषी, वैद्यकीय, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, शिक्षण, पत्रकारिता, अध्यात्म, साहित्य, राजकारण इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या व्यक्तीसाठी हे पुरस्कार ठेवण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीकडून किंवा त्यांच्या सुचकाकडून या पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. प्रस्तावासोबत व्यक्ती परिचय, केलेल्या कामाचा तपशील, पुराव्या दाखल बातमीचे कात्रण, फोटो आणि दोन पासपोर्ट फोटो व आधार कार्ड इत्यादी साहित्य पाठवावे.

आलेल्या प्रस्तावाची छाननी निवड समितीच्या समोर करण्यात येईल व त्यातून पुरस्कार प्राप्त व्यक्तींची निवड करण्यात येईल. इच्छुकांनी आपले प्रस्ताव ड. सीताराम पोकळे पत्रकार मु. पो. बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड यांच्याकडे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत किंवा तत्पूर्वी पाठवावेत असे आवाहन मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार दादा पवळ यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या खरडून गेलेल्या जमिनीला पुनर्भरणासाठी भरीव मदत करा - बदामराव पंडित

## दगडगाव,औरंगपूर कुकडा शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी @ गेवराई**

गेवराई विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने सर्व पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे त्यासोबतच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवरील माती खरडून वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई देण्यात यावी पण त्यासोबतच जमीन करून वाहून गेलेल्या शेतकऱ्यांसाठी जमीन पुनर्भरण करण्यासाठी आर्थिक मदत करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री ना दत्ता मामा बारणे यांच्याकडे केली आहे.

गेवराई तालुक्यातील दगडगाव, औरंगपूर कुकडा येथील शेतकरी विविध मागण्यांसाठी दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ पासून बेमुदत धरणे आंदोलनावर बसले आहेत. अतिवृष्टीमुळे आणि सिंदफणा पात्रात पाणी सोडल्याने पूर परिस्थिती निर्माण झाल्याने आमच्या सर्व पिकांचे अतोनात नुकसान तर झाले आहेच पण त्यासोबत आमच्या जमिनीची माती सुद्धा वाहून गेली असून संपूर्ण जमीन खडकाळ झाली आहे. अशा परिस्थितीत महसूल विभागाचे अधिकारी आमच्या बागायती जमिनीची नोंद सातबारावर असताना सुद्धा कोरडवाहू जमिनीचे पंचनामे सरसकट करत आहेत. बागायती असूनही आम्हाला त्याचे बागायती नुकसान आर्थिक मदत मिळत नाही. अशा विविध मागण्या दगडगाव, औरंगपूर कुकडा येथे धरणे आंदोलनास बसलेल्या शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह



शेतकऱ्यांनी केली आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी तात्काळ दि ३ ऑक्टोबर रोजी सर्व आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची प्रत्यक्ष जाऊन भेट घेतली. त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. त्यांच्या समवेत माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे उपस्थित होते. त्यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी, गेवराई मतदार संघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गोदावरी व सिंदफणा नदीला पाणी सोडल्याने आलेल्या पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे सर्व उभे पिके वाहून गेली असून त्यांच्या जमिनी खरडून वाहून गेलेल्या आहेत. पिकाची नुकसान भरपाई मिळेल त्यानंतर पुन्हा पेरणीही केली जाईल परंतु संपूर्ण जमिनीवरची मातीच वाहून गेली असेल तर त्या शेतकऱ्याने पेरणी करायची कुठे? असा प्रश्न उपस्थित करून खरडून जमिनी वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना इतर ठिकाणाहून गाळ किंवा काळी माती शेतामध्ये टाकून पुनर्भरण करण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी आणि पुन्हा त्यांच्या पिकासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्ता मामा बारणे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# हृदयरोग लक्षणे आणि उपचार पद्धती - डॉ. गौरव पुंडे

मुखेड /प्रतिनिधी

मुखेडचे भूमिपुत्र तथा तथा ग्लोबल हॉस्पिटल नांदेडचे सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. गौरव दिलीप पुंडे यांनी सांगितलेल्या हृदयरोग लक्षणे व त्यावर उपचार पद्धती या विषयी अधिक माहिती हवी असल्यास ग्लोबल सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व्ही.आय.पी. रोड नांदेड. डॉ. गौरव दिलीप पुंडे साहेब यांना मो. ९१३००४३००० या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन डॉ. गौरव पुंडे यांनी केले आहे. लोकांमध्ये जनजागृतीसाठी व हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी जागतिक हृदयदिन दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी जगभरात साजरा केला जातो.

एरलह `पश- ढशरलह `पश या संकल्पनेतून प्रत्येक व्यक्तीत हृदय आरोग्याविषयी जागरुकता निर्माण केल्यास निश्चितच हृदयरोगाचा धोका कमी होईल.

या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येकाने स्वतःची व आपल्या प्रियजनांची चांगली काळजी घेणे तसेच हृदयाच्या चांगल्या आरोग्यासाठी प्रत्येकाला निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीचे पालन करण्यास प्रोत्साहित करावे.

वर्ल्ड हार्ट फेडरेशनच्या मते, हृदयरोगामुळे जगात दरवर्षी अंदाजे १७.७ दशलक्ष मृत्यू होतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार गेल्या दोन दशकांमध्ये हृदयरोगामुळे जगभरात सर्वाधिक मृत्यू




झाल्यामुळे

हा आजार खूप घातक असल्याचे अधोरेखित झाले आहे. थकज ने जारी केलेल्या अहवालात २००० ते २०१९ या २० वर्षांच्या कालावधीत विविध आजारांमुळे झालेल्या मृत्यूंची नोंद घेण्यात आली आहे.

जगभरात मृत्यूला कारणीभूत ठरणार्या दहा आजारांपैकी सात असंसर्गजन्य आजार आहेत. या यादीवर नजर टाकल्यास हृदयरोग किंवा हृदयविकार पहिल्या स्थानी असल्याचे दिसून येते.

भारतीय अहवालानुसार हृदयरोगामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण २०२० पर्यंत ४.७ दशलक्ष प्रतिवर्ष असून ते वेगाने वाढत आहे. सध्या हृदयविकाराच्या झटक्याला वयाची अट राहिली नाही. अगदी कमी वयातही हार्ट अटॅक येत आहे. कोरोना नंतर तर हृदयरोगाचे प्रमाण अधिक वाढलेले दिसून येते. जणु काही हृदय रोगाची लाटच आली आहे. निसर्गतः भारतीयांना पाश्चिमात्य लोकांपेक्षा हृदयरोगाचा धोका अधिक संभवतो; कारण भारतीयांच्या हृदयाच्या रक्तवाहिन्यांचा आकार हा लहान आहे. लोकसंख्येचा विस्फोट अन् त्यातून निर्माण झालेली स्पर्धा व ताणतणाव यामुळे भारतीयांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

हृदयविकाराचा झटका काय असतो ?

आपल्या हृदयाचा रक्त पुरवठा तीन बाजूंनी होतो. शरीरातील कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. ४०% पर्यंत अडथळा जास्त समस्या निर्माण करत नाही. जेव्हा हा अडथळा ७०%पेक्षा जास्त वाढतो तेव्हा हृदयातील रक्त प्रवाह मंद अथवा बंद होतो आणि रूग्णास हृदयविकाराचा झटका येतो.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांसाठी प्रा. उत्तमकुमार कांबळे धावले !

देगलूर /प्रतिनिधी

देगलुर महाविद्यालयाचे मा. उप - प्राचार्य , प्रा. उत्तमकुमार रामचंद्र कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दि. ६ ऑक्टो. रोजी जि.प.कें. प्राथमिक शाळा आलुर ता . देगलुर येथे सकाळी - ११. ०० वा. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमाला सर्व क्षेत्रातील मान्यवर, पालक, व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. उत्तम कुमार कांबळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

हल्ली बिघडत चालेल्या चालीरीतीला पूर्णविराम देत एक माणुसकीच्या सरळ भावनेतून देगलुर महाविद्यालयाचे माजी उप - प्राचार्य प्रा.उत्तमकुमार रामचंद्र कांबळे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार तुरे, यांच्यावर अवाढव्य व्यर्थ खर्च न करता मान्यवरांच्या हस्ते पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन अतिशय साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा कौतुकास्पद अतिशय स्तुत्य निर्णय घेतला असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण , तर प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष, तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर सह प्रमुख अतिथी म्हणून

मा.श्री अनुप पाटील (उपजिल्हाधिकारी, देगलूर) मा.श्री भरत सुर्यवंशी (तहसिलदार, देगलूर) मा. श्री अविनाशजी हसनाळकर (ज्येष्ठ पत्रकार) मा.श्री मारोती मुंडे (पोलीस निरीक्षक, देगलूर) मा.श्री डॉ. श्रावण रॅपनवाड (महासचिव म.प्र. नियंत्रण कमिटी) मा. श्रीमती राजेश्री राजेश्वरराव पोकर्णे (देशमुख) (सरपंच ग्रा.पं. आलूर) मा. श्रीमती श्वेताई बसराज पाटील (तालुकाध्यक्ष डॉक्टर कमिटी ता. देगलूर) मा.श्री सुनील हणमंत शिंगाडे (उपसरपंच ग्रा.पं. आलू



मा. श्री मोगलाजी इरन्ना शिरशेटवार (शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी, देगलूर शहर) मा. श्री मंगलसिंह राजेंद्र देशमुख (मा. ग्राहक कृष्ण.उ.बा.स. देगलूर) मा.श्री निवृत्तीदादा कांबळे (माजी जि.प.सदस्य) मा.श्री विष्णुक खांडेकर (माः उपसभापती) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक प्रा. उत्तमकुमार कांबळे मित्र परिवार, देगलूर हे असुन या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. उत्तमकुमार कांबळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रुग्ण सेवा मंडळात मोफत नेत्रतपासणी शिबीर संपन्न

४८व्या वर्धापन दिनानिमित्य

देगलूर : देगलूर शहर व परिसरातील ग़रीब व गरजू शेतकरी - शेतमजूर लोकांना नाममात्र दरात आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हनुण जेष्ठ ऋदयरोगतज्ञ तथा माज़ी ख़ासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य सेवेचे पवित्र कार्य करणा-या रूग्ण सेवा मंडळाला ४८ वर्ष पूर्ण झाले आहेत.या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्य देगलूर महाविद्यालयातील एन सी सी व एन एस एस विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी मोफ़त नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या मोफ़त नेत्र तपासणी शिबीरात एकूण ४३ विद्यार्थ्यांची संगनकाद्वारे नेत्र तपासणी करण्यात आली.प्रस्तुत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सूर्यकांत नारलावार होते तर व्यासपीठावर सहसचिव प्रा डॉ बी आर कतुरवार, कार्यकारिणी सदस्य दमन




काका चिद्रावार, मारोती गायकवाड, एन सी सी प्रमुख प्रा डॉ नीरज उपलंचवार, रासेयोप्रमुख प्रा डॉ संजय देबडे, उद्योजक अनिल चालिकवार, डॉ ज्योती पेदेकर नेत्रतपासणीस प्रतिभा तोरणे उपस्थित होते.

याप्रसंगी सूर्यकांत नारलावार अध्यक्षीय समारोपप्रसंगी विचार मांडताना डॉ. व्यंकटेश काब्दे यानी अमेरीकेत वैद्यकीय शिक्षण घेऊन आल्याननंतर मुंबईची मोठ्या हॉस्पिटलची संधी नाकारून त्यांनी देगलूर भागातील गरीब लोकांची सेवा करण्यासाठी रुग्ण सेवा मंडळ दिनांक २ ऑक्टोबर १९७७ रोजी स्थापना केली. याप्रसंगी प्रा बालाजी कतूरवार व मारोती गायकवाड यानी रुग्ण सेवा मंडळाच्या विस्तार , दाभड येथिल आरोग्य केंद्र, नांदेड येथिल शासन मान्य सार्वजनिक वाचनालय व संस्थेद्वारे राबविन्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा डॉ बी आर कतूरवार तर आभार प्रा संजय देबडे यानी मानले.

# उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' भव्य रोग निदान व उपचार शिबिर संपन्न

देगलूर : देशाचे लोकप्रिय पंतप्रधान जननायक नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान देशभरात 'सेवा पंधरवाडा' आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियाना अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, देगलूर येथे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन श्रीमती शीतलताई रावसाहेब अंतापुरकर यांच्या हस्ते फित कापून झाले. या वेळी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, भाजपा महिला मोर्चा शहराध्यक्ष कु. भावना दाशेटवार, भाजपा शहराध्यक्ष प्रशांत दासेटवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या प्रारंभी उपस्थित



मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, रुग्ण व नातेवाईक यांनी सामूहिक अवयवदान शपथ घेतली. यानंतर विविध रोग निदान व उपचार स्टॉल्स उभारण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात फळवाटप, आयुष्मान कार्ड व वयवंदना कार्ड वाटप करण्यात आले.

या शिबिरात एकूण ८९३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. महिलांची रक्तदाब, मधुमेह, दंतरोग, नेत्ररोग, स्तन व गर्भाशय विकार, मुख व कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी लसीकरण, सोनोग्राफी, रक्त तपासणी, क्षयरोग तपासणी, किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, मासिकपाळी स्वच्छता मार्गदर्शन, सिकलसेल तपासणी, पोषण व मानसिक आरोग्य मार्गदर्शन, नाक-कान-घसा, आयुष उपचार तसेच बालरुग्ण तपासणी अशा विविध तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या.

दरम्यान, नांदेड जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांनी रुग्णालय व परिसराची पाहणी करून रुग्णांच्या समस्या जाणून घेतल्या. उपाययोजना सुचवून वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.पूरक उपक्रमांत आयुष्मान कार्ड, आभा कार्ड निर्मिती, अवयवदान नोंदणी, रक्तदान शिबिर यासह अनेक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी, स्टाफ व कर्मचाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली.



# भोसले अध्यापक विद्यालयात महात्मा गांधी जयंती साजरी

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुक्रामाबाद येथील भोसले अध्यापक विद्यालयांमध्ये लालबहादूर शास्त्री व महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री चनावार संजय. व प्रमुख पाहुणे म्हणून पांढरे सर यांची उपस्थिती लाभलेली होती. तसेच संस्थेचे सचिव दलित मित्र पुरस्कार. (महाराष्ट्र राज्य). श्री भोसले रामराव. तसेच प्रा. नेलवाडे सतीश, प्रा.आशुतोष पाटील. हे उपस्थित होते. तसेच प्राध्यापक ऍड. गायकवाड पी.एम. प्राध्यापक शेख अहमद. प्राध्यापिका पांचाळ मॅडम गायकवाड मयुरी प्रा. दिलीप भोसले हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोटरे व सुर सुरनर. स्नेहा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मारपले.बरमें. व लोगणे. यांनी परिश्रम घेतले. अध्यक्षीय भाषणामध्ये भाऊसाहेब कॉलेजचे प्राचार्य. चनावार सर यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन पर आपले विचार व्यक्त केले.आभार कॉलेजचे प्रशिक्षणार्थी तोतरे यांनी व्यक्त केले.

## ग्रामीण पोलीसांनी वाजेगाव बायपास रोड वरील संदीप बार फोडुन चोरी करणारे

# आरोपींना १०,७५०/- रुपयाचे मुद्देमालासह घेतले ताब्यात

नवीन नांदेड - जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड अबिनाश कुमार यांनी चोरी,घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत सर्व पोस्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते.

वरील नमुद गुन्हयातील फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे येवून तक्रार दिली होती की, वाजेगाव बायपास रोडवरील संदीप बारच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन रॉयल स्ट्रॉंग कंपनी च्या दारुचा एक बॉक्स किंमती १२,०००/- रुपये व रोख रक्कम सात हजार रुपये असे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले आहे बाबत तक्रार दिली होती, त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक




ओमकांत चिचोंलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व सोबत पथकातील अंमलदार असे दिनांक ४ऑक्टोबर रोजी वेळ १.१४ वाजता पेट्रोलीग करीत असताना त्यांना गोपनीय माहीती मिळाली की, वर नमुद गुन्हयातील दोन आरोपी शेख इमरोज शेख अब्दुल रज्जाक व इरफान खान नसरत खान हे चोरीचा माल विकण्याच्या उद्देशाने वाजेगाव बायपास सर्व्हिस रोडवर थांबले आहेत अशी माहीती मिळाल्याने नमुद अधिकारी व अंमलदार यांनी सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी व त्याचे इतर दोन सहकारी शेख इलीयास शेख खदीर रा. वाजेगाव व सोहेल उर्फ छोटा गुज्जर असे चौघांनी

मिळून संदीप बार फोडून चोरी केल्याचे सांगीतल्याने वर नमूद दोन आरोपीकडून वरीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व पोलीस अंमलदार वसंत केंद्रे , विष्णु कल्याणकर, संतोष पवार, मारोती पंचलिग,गंगलवाड यांनी शेख ईमरोज शेख अब्दुल रज्जाक,इरफान खान नसरतखान, यांना मुद्देमाल सह अटक केली आहे,,केलेल्या कामगिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,

# राष्ट्रपिता गांधी व शास्त्री जयंतीनिमित्त उपजिल्हा रुग्णालय अंबड येथे तंबाखूमुक्तीची शपथ

प्रतिनिधी @ अंबड

दि.२ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त उपजिल्हा रुग्णालय अंबड येथे अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष दिवशी आंतरराष्ट्रीय दिनाचे औचित्य साधत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूमुक्तीची शपथ सर्वांना देण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रुग्णालयाचे मा.



वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरमवाड सर यांनी भूषविले. तसेच मा. वैद्यकीय अधिकारी डॉ. घुले सर, डॉ. आडे सर,डॉ.सिध्दीकी,दैनिक समर्थ राजयोगचे पत्रकार फारुक शेख यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शपथविधी प्रसंगी उपस्थितांनी तंबाखूविरहित समाज निर्मितीचा संकल्प व्यक्त केला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरमवाड यांनी गांधीजींच्या अहिंसेच्या, सत्याच्या आणि शुद्ध जीवनशैलीच्या संदेशाची आठवण करून दिली. त्यांनी आरोग्यदायी व व्यसनमुक्त आयुष्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी केले तर आभार प्रदर्शन उपस्थित अधिकारी यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित अधिकारी, कर्मचारी व पत्रकारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या उपक्रमामुळे समाजात व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश पसरला असून गांधी-शास्त्री यांच्या जयंतीला योग्य अशा स्वरूपात आदरांजली अर्पण करण्यात आली.

# जानपिर विद्यालयातील शालेय जलतरण, शूटिंग बॉल स्पर्धेत खेळाडूंचे अभूतपूर्व यश सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड

प्रतिनिधी @ पाटोदा

महाराष्ट्र राज्य क्रीडा विभाग पुणे यांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली दिनांक २३/०९/२०२५, २४/०९/२०२५ व दि.०१/१०/२०२५ रोजी बीड जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत व शूटिंग बॉल स्पर्धेत जानपिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाळवंडी/ कारेगाव ता. पाटोदा जि बीड या विद्यालयाची विविध वयोगटामधील जलतरण स्पर्धेमध्ये शूटिंग बॉल स्पर्धेत अनेक खेळाडूंनी बाजी मारली हे सर्व खेळाडू विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहे या खालील खेळाडूची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे

जलतरण स्पर्धा

१) देवडे ऋतुजा सुंदर २०० व ८०० मीटर प्रथम

२) पन्हाळकर उद्धव अजिनाथ १०० मीटर द्वितीय

३) सय्यद मुजकिर मुक्रम ४००मीटर प्रथम

४) पन्हाळकर उद्धव अजिनाथ ८०० मीटर प्रथम

५)पुरी शिवसमर्थ लहू ८०० मीटर द्वितीय

१७ वर्षे वयोगट १०० मीटर रिले जलतरण सांघिक खेळ

६) पुरी शिव समर्थ लहू

७ साळुंखे शिवराज किशोर

८) मंडलिक प्रणव कुंडलिक

९) जाधव समाधान मनोहर

१०) पन्हाळकर उद्धव आजिनाथ.

मॉडर्न पॅथॉलॉन * जिल्हास्तरीय ** स्पर्धा*

११) डोके राहुल राजेंद्र प्रथम१२) देवडे ऋतुजा सुंदर प्रथम१३) रसाळ हरी ओम कल्याण प्रथम

*जिल्हास्तरीय शूटिंग बॉल स्पर्धा १९ वर्ष वयोगट संघ प्रथम यामध्ये पाटोळे गायत्री शरद, शेख फातिमा जाकिर , डोके वैष्णवी गहिनीनाथ, पन्हाळकर अनुजा नवनाथ, मंडलिक ज्योती विलास, कठाळे शिवकन्या शांतीलाल, दराडे प्रतीक्षा बाबासाहेब, खंडागळे साक्षी दिलीप, थोरात मोहिनी मोहन, कठाळे सरिता संभाजी यांचा समावेश होता हा संघ ही विभागीय स्तरास पात्र झाला आहे याबद्दल विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती शेख के. एस. मॅडम यांच्या हस्ते सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री. पठाण एच के सर व त्यांना सहकार्य करणारे श्री. पाटील एस. बी. सर, प्रा. पाटील सर, श्रीमती मोमीन एस



एस, शेख ए एन सर यांचेही कौतुक केले व विभागीय स्तरावर यशस्वी होण्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

या यशस्वी व गुणी खेळाडूंना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापिका क्रीडा विभाग प्रमुख सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अभिनंदन संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव श्री. जे एल पठाण साहेब (गुरुजी) व संस्थेचे अध्यक्ष तथा नाळवंडी गावचे सरपंच श्री डॉ. इकबाल पठाण साहेब गावातील प्रतिष्ठित नागरिक व क्रीडा प्रेमी नागरिक यांनी अभिनंदन केले व पुढील विभागीय स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ईवळेश्वरात पारंपारिक वाद्य वाजवत श्री महालक्ष्मी दुर्गा मातेला शांततेत विसर्जन...!

माहूर : ईवळेश्वरच्या सार्वजनिक दुर्गामाता उत्सव समितीच्या वतीने पारंपारिक वाद्य वाजवत श्री महालक्ष्मी दुर्गा मातेला शांततेत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी जय बजरंग बली मंदिराजवळील परिसरात माता श्री महालक्ष्मी दुर्गा देवीची आरती करण्यात आली.विशेष म्हणजे महीला व नव तरुण मुलींनी एकसारख्या वेशभूषेत ढोल ताशांचा गजर करत गुलालाची मुक्त उधळण करण्यात आली.नवरात्रीनिमित्त मागील नऊ दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.दिनांक ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी जय महालक्ष्मी दुर्गा मंडळाकडून दुर्गा मातेच्या मिरवणूकीत ढोल-ताश्याच्या आणि फटाकेच्या अतिष बाजीने



या मिरवणुकीत दुर्गा माता की जय,अंबे माता की जय,अशा जयघोषात मातेची मिरवणूक शांततेत पार पडली.यामुळे या परिसरात आनंदाचे वातावरण पसरले होते.यावेळी गावातील लहान थोर माता भगिनींनी ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजीत तसेच गरबा,दांडीयाच्या तालावर ईवळेश्वर येथील मंडळांच्या वतिने श्री महालक्ष्मी दुर्गामातेचे विसर्जन मिरवणुक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या श्री महालक्ष्मी दुर्गा मातेची मिरवणूक मार्गाने काढण्यात आली असून गेल्या नऊ दिवसांपासुन ईवळेश्वर येथील श्री महालक्ष्मी दुर्गा मंडळांच्यावतीने दररोज सकाळ,संध्याकाळी महाआरती,भजन,गरबा,दांडीया असे विविध स्पर्धा आयोजित करण्यात आले असून शेवटच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या विविध कार्यक्रमांबरोबरच गरबा व दांडियाचेही आयोजन करण्यात आले होते. युवक-युवतींनी मनसोक्तपणे गरब्याचा आनंद लुटला.तरूणाईसह वयोवृध्दानेही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे संपूर्ण ईवळेश्वर गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. श्री महालक्ष्मी दुर्गा मंडळांनी दिनांक ४ऑक्टोबर २०२५रोजी सकाळी विसर्जन मिरवणूक सोहळ्यास सुरूवात केली.आणि संध्याकाळी विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडली श्री महालक्ष्मी दुर्गा मातेच्या मंडळांनी खास आकर्षक करून विद्युत रोषणाई तयार करण्यात आली होती.

श्री महालक्ष्मी दुर्गामातेच्या विसर्जन मिरवणुकीत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.या मिरवणुकीत महिला व नागरीकांची मोठी गर्दी जमली होती फटाक्यांची आतीषबाजी करत हि मिरवणूक शांततेत काढून विसर्जनासाठी मार्गस्थ करण्यात आले होते.यावेळी अतिष राठोड पोलीस पाटील,सरपंच पती दुधराम राठोड,महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष अर्जुन थावरा जाधव,गणेश बल्लदेव जाधव,नारायण चव्हाण,रवि जाधव (डीलर),बदु राठोड, बळीराम जाधव,रवि जाधव(नाईक) नारायण राठोड(कारभारी) रघुनाथ पतंगे,परसराम जाधव,विष्णू जाधव,ज्ञानेश्वर कन्हाळे, गणेश पतंगे,शंकर पतंगे,सजनलाल जयस्वालजय महालक्ष्मी दुर्गा मंडळाचे अध्यक्ष हिरासिंग राठोड आदीसह मोठ्या संख्येने माता भगिनींनी नागरीक उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत आठ सराईत गुन्हेगारांना हद्दपार

नांदेड :वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुस्क्या पोलीस दलाकडून आवळल्या जात असून ऑपरेशन प्लश आउट अंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आठ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन प्लश अंतर्गत पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना हद्दपार प्रस्ताव दाखल करावे असे सर्व पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांना आदेश दिले होते त्यानुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुरमे . ज्ञानेश्वर मठवाड . बाबुराव चव्हाण . केंद्रे मुंडे . शेख केजबंद . पवार . कल्याणकर . माळगे . सिरमनवार पंचलिंग यांनी सराईत गुन्हेगारांच्या हद्दपारीच्या प्रस्ताव दाखल केला त्यात सराईत गुन्हेगार बळीरामपूर



येथील रहिवासी आरोपी सुमेध उर्फ बाळा राजू वाघमारे दीपक उर्फ गोगलू .सुहास गोडबोले सिडको येथील विजयनगर येथील रहिवाशी आरोपी विशाल रमेश शितळे गोविंद ईश्वर वट्टमवार शक्ती नगर हडको येथील रहिवासी आरोपी सटवाजी ज्ञानोबा ढवळे . अशिष सटवाजी ढवळे . क्रांती चौक सिडको येथील सुनील भगवान सूर्यवंशी बाबुळगाव येथील रहिवाशी आरोपी राहुल गोविंद लांडगे यांचा समावेश आहे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सदर प्रस्तावाची पडताळणी करून ३० सप्टेंबर २०२५ रोजी आदेश काढून वरील गुन्हेगारांना सहा महिन्यासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले आहे उपरोक्त हद्दपार केलेल्या व्यक्तींना सदरचा हद्दपार आदेश बजावून त्यांना नांदेड जिल्ह्यातून निघून जाण्याची समज देण्यात आली आहे .

# सैनिक विचारधारेचे अनुकरण करावे भगवान नागरगोजे

मुखेड/प्रतिनिधी

सद्याला व्यसनाधीनतेमुळे युवा पिढी बिघडत चाली असुन एक सुदृढ निरोगी व व्यसनाधीनते पासून दूर राहण्यासाठी व देशभक्तीसाठी आपण सैनिक विचारधारेचे अनुकरण करावे असे मत माजी सैनिक भगवानराव नागरगोजे यांनी मांडले आहे.आपल्या आई-वडिलांची नावं, संपत्ती आपल्याला वारसा म्हणून मिळू शकते, पण आरोग्य आणि शरीर हे आपल्यालाच घडवावं लागतं...कारण खरं तर पैशाने माणूस श्रीमंत नसतो, आरोग्य आणि चांगल्या नात्यांनीच खरा श्रीमंत ठरतो. म्हणून सर्वांनी आरोग्याला जपले पाहिजे.संपत्ती भरपूर असली तरी खाता येत नाही, हेच आयुष्याचं मोठं दुर्दैव आहे...म्हणून शरीर जपा, आरोग्य जपा, आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे चांगली माणसं जपा.

कारण जसं उत्तम शरीराशिवाय आनंद नाही, तसंच जिवलग नात्यांशिवाय जीवनात आनंद नाही आपल्याकडे असलेला पैसा फक्त आपलं वागणं श्रीमंत करतो, पण आपले संस्कार, संस्कृती, ज्ञान, शहाणपण हेच आपलं जगणं श्रीमंत करतात. म्हणून जी माणसं आपल्यासोबत असतात ती जगायला शिकवतात, आणि जी आपल्याला सोडून जातात.




ती पुढे कसं वागायचं ते शिकवतात.....म्हणून माणसाचं महत्त्व आयुष्यात अनमोल असतं.मग ते येणारे असोत वा जाणारे, त्यांना जपा, प्रेम द्या, मान द्या. याचं नाव आहे सैनिक कुटुंबाचं खऱ्या अर्थानं नातं.आजचा तुमचा दिवस आरोग्य, आनंद, आणि मायेच्या माणसांच्या सहवासाने भारलेला जावो! सर्वांनी सैनिक विचारधारेचा अवलंब करावे असे आवाहन माजी सैनिक भगवानराव नागरगोजे यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत रविराज जाधवनी मारली प्रथम क्रमांकाची बाजी

## खा.प्रा.रविंद्र चव्हाण यांनी केले रविराजचे अभिनंदन

नांदेड : नायगाव :आपल्या विद्यार्थ्याला वेळोवेळी शिक्षकांचे व आई-वडिलांचे योग्य ते मार्गदर्शन लाभले की त्यांच्यात एक उर्मी निर्माण होते हे अधिक सांगणे नको. तालुक्यातील मौजे सुजलेगाव येथील प्रसिद्ध शाहीर बळीराम जाधव सुजलेगावकर यांनी आपल्या मुलाला योग्य ते मार्गदर्शन केले असल्याने गुरुजींच्याही मार्गदर्शनामुळे रविराज बळीराम जाधव हा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाची बाजी मारली असल्याने खासदार रवींद्र चव्हाण यांनी रविराज यांचे अभिनंदन केली आहे.

नायगाव शहरातील जनता कनिष्ठ महाविद्यालयाच्या अनेक खेळाडूची या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड



करण्यात आलेली होती.क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये जनता कनिष्ठ महाविद्यालयातील रविराज बळीराम जाधव या विद्यार्थ्याने ८०० मीटर धावून प्रथम क्रमांक मिळविला आहे. आजच्या या युगात मर्दानी खेळ लोप पावत चालले आहे पण काळाची खरी गरज असून यातून मुलांचे शरीर सुदृढ राहते आणि यश देखील प्राप्त होते त्या यशांची पहिली पायरी रवीराजने पार केली आहे याबद्दल त्यांच्या आई-वडिलांसह गावकरी मित्रपरिवार व जनता कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकवृंद यांना रविराज जाधव यांच्या बद्दल सार्थ अभिमान वाटत आहे.

या खेळाडूंना मार्गदर्शन क्रीडा शिक्षक प्रा बैस डी.आर. व प्रा.शिंदे संगमेश्वर यांनी मार्गदर्शन केले असून या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष खासदार प्रा.रवींद्र पा. चव्हाण सचिव केशवराव पा. चव्हाण प्राचार्य के.जी. सूर्यवंशी उप प्राचार्य प्रा. सोमावार पर्यवेक्षक प्रा. पाटील पर्यवेक्षिका प्रा.सौ शिंदे मॅडम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी रविराज यांचे अभिनंदन केले.

# सामाजिक कार्यकर्ते शंकरराव हंबर्डे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत मुत्ररोग व नेत्ररोग तपासणी शिबीराचे आयोजन

नवीन नांदेड -हंबर्डे युरोकेअर युरॉलॉजी व सर्जिकल सुपरस्पेशालिटी द्वारा आयोजित

तीर्थक्षेत्र श्री काळेश्वर मंदिर संस्थानचे सचिव श्री. शंकरराव बळीरामजी हंबर्डे यांच्या वाढदिवसा निमितमोफत मुत्ररोग व नेत्ररोग तपासणी शिबीर रविवार दि. ५ ऑक्टोबर २०२५ वेळ स १० ते सायं ५ पर्यंत आयोजित करण्यात आले असून संततधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांची हाताशी आलेली पिके नासधुस झाली आहे, त्यामुळे वाढदिवस साध्या पणाने साजरा करून वाढदिवसाच्या निमित्ताने पुरग्रस्त शेतकरी बांधीत शेतकऱ्यांना ही आर्थिक मदत करण्यात येणार आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने साध्या पध्दतीने वाढदिवस साजरा करण्यात येणार असून बांधीत पुरग्रस्त शेतकरी बांधवांना आर्थिक मदत करण्यात येणार आहे,तर हंबर्डे युरोकेअर सुपर स्पेशालिटी व्दारा आयोजित मुत्ररोग व नेत्ररोग तपासणी व रूग्णांवर आजारावर शस्त्रक्रिया करावी लागल्यास शिबीरातील रुग्णांलय लक्षणे मुतखड्याचे आजार.

पुरूष-स्त्रिया व लहान मुलांचे मुत्ररोग पुरुष ग्रंथीचे आजार,किडनी व मुत्राशयाचे कर्करोग,पुरुष बंधत्व व नपुंसकता,हार्निया,हायड्रोसिल, मुळव्याध,भगंदर,अपेंडिक्स व पित्ताशयाचे आजार,लघवी सतत येणे.

लघवीची धार कमी होणे.लघवीला जोर लावावा लागणे,लघवीतून रक्त जाणे.मुत्र मार्गातील जंतू संसर्ग, नेत्ररोग व लक्षणे मोतीबिंदू प काचबिंदू,मधुमेह रूग्णांची नेत्र तपासणी डोळ्याचा तिरळेपणा, डोळ्याची नजर कमजोर होणे.सतत डोळ्यातून पाणी



येणे,

डोळ्याला चिपड येणे ,यावर या शिबिरात तपासणी करण्यात येणार असुन नावनोंदणी करून या शिबिरात जास्तीत जास्त रूग्णांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.प्रमोल हंबर्डे,व डॉ.मंजुश्री हंबर्डे यांनी केले आहे.

# लढणारा समाज अधिकार व सन्मानासाठी पात्र-प्रा.रामचंद्र भरांडे

नांदेड महाराष्ट्रात लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक चळवळीतुन मागील तीन दशकांपासून अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणासाठी मातंग समाजासह बुरुड,होलार,मेहत्तर,ढोर, चर्मकार,मांगगारुडी, मादगी,खाटीक,तत्सम जातीना सोबत घेऊन सामाजिक न्यायाची लढाई अधिक गतीमान करण्यासाठी सातत्याने संघर्ष,व समाजजागृती करण्यात आले असुन.

आरक्षण लाभवंचित जातसमुहांच्या हक्क व अधिकाराची चळवळ कोणाच्या अनुदानावर किंवा सहानुभूती वर न चालवता स्वाभिमानी युवकांना संघटित करून सत्तेत कोणताही पक्ष असो, मुख्यमंत्री कोणीही असो त्यांना सडेतोड जबाब विचारण्याचे काम लोकस्वराज्य आंदोलन आजपर्यंत करत आले आहे, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्गिकरणाबाबत दिलेली प्रतिक्रिया म्हणजे एक डाव आहे.असे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष प्रा रामचंद्र भरांडे यांनी कृष्णुर येथे विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

कृष्णुर येथे विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी कामाजीराव वाघमारे, देवराव वाघमारे,माधव गायकवाड,संजय वाघमारे, सचिन वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रा.रामचंद्र भरांडे यांनी कृष्णूर येथील लढाऊ तरूण, महिला, नागरिकांनी जेल भरो आंदोलनात १५ किलोमीटर पदयात्रा काढून सहभाग नोंदवला होता. विजयादशमी व धर्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सहभागी आंदोलकांवर पुष्पवृष्टी करून सन्मान करण्यात आला.

यावेळी मराठवाडा प्रवक्ता सचिन वाघमारे यांनी प्रास्ताविकातुन अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लढ्याचे प्रणेते, संघर्षनायक प्रा.रामचंद्र भरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली १९ सप्टेंबर २०२५ च्या जेल भरो आंदोलनाचे नेतृत्व करण्याचा बहुमान कृष्णुर येथील स्वाभिमानी मातंग समाजबांधवांना मिळाला,तो समाजबांधवानी तन,मन, धनाने जबाबदारी स्विकारून आम्ही इथल्या प्रस्थापीत व्यस्थेसोबत खंबीरपणे लढु शकतो हे ऐतिहासिक जेलभरो आंदोलनाच्या माध्यमातुन दाखवून दिले.यापुढेही आपल्या हक्कासाठी,अन्याय अत्याचाराच्या विरोधात एकजुटीने लढण्यासाठी आम्ही तयार आहोत असे मत व्यक्त केले.

यावेळी विजयादशमी व धर्मचक्र प्रवर्तन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशिलाबाई टिकेकर,गयाबाई वाघमारे,सुशिलाबाई वाघमारे,ललिता वाघमारे,अहिल्याबाई वाघमारे,सविता वाघमारे,भारतबाई वाघमारे, गंगाबाई वाघमारे,शोभाबाई वाघमारे,सुमनबाई वाघमारे,देवुबाई वाघमारे, लक्ष्मीबाई वाघमारे,आशा वाघमारे,आदी महिला पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सचिन वाघमारे यांनी सुत्रसंचालन केले.आभार देवराव वाघमारे यांनी केले.

# मुखेड पोलीस ठाण्यात पोलीस अधिकाऱ्यास धक्काबुक्की ..!

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

अवैध दारू विक्री केस करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकास आरोपीने आणि भावाने मुखेड पोलीस ठाण्यात येऊन वाद निर्माण करीत धक्काबुकी केली शासकीय कामात अडथळा केल्याच्या प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

मुखेड पोलीस ठाण्यातील अभिजीत तुतुरवाड तीन ऑक्टोबर रोजी पोलीस ठाण्याच्या आधीच पांडुरंग रघुनाथ माचेवार यांच्या विरोधात अवैध दारूची केस करीत होते तेवढ्यात तिथे मुखेड शहरातील वाल्मिक नगर येथील रहिवाशी आरोपी अंकुश रघुनाथ माचीवड आला त्यांनी पोलीस उपनिरीक्षक अभिजीत उतरवाडे यांच्या समावेत वाद घातला तुम्ही माझ्या भावाच्या विरोधात केस कशी करता असे विचारून त्यांनी धक्काबुक्की केली याप्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडता निर्माण केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे पुढील तपास उपनिरीक्षक एम आर हे करीत आहेत

# प्रभाग ०५ मध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाचे प्रयत्न: शिवाजीराव भरोसे

परभणी (प्रतिनिधी) : परभणी शहरातील प्रभाग ०५ मध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आज उत्साहात पार पडले. या विकासकामांना पालकमंत्री आ. मेघना ताई बोर्डीकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते आ. रामप्रसादजी बोर्डीकर आणि मंत्री सुरेशराव वरपूडकर यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला.

सुयोग कॉलनी येथे गोकुळ दाड ते संकेत शिंदे यांच्या निवासस्थाना पर्यंत ३५ लाख रुपये खर्चाच्या डांबरी रस्त्याचे, ज्ञानेश्वर नगर येथे खरबे ते महाजन यांच्या घरापर्यंत २५ लाख रुपये खर्चाच्या डांबरी रस्त्याचे, तसेच लोकमान्य नगर येथे भरोसे ते दुधाटे यांच्या घरापर्यंतच्या डांबरी रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे भूमिपूजन महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजीराव भरोसे आणि समशेर भैय्या वरपूडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रितेश जैन झाबंड, बबलू उर्फ गणेश टाक, शंकर आजेगावकर, स्पंदन देवडे, ओम मुदिराज, तसेच भाजप पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरी व ग्रामीण भागातील सार्वजनिक नवदुर्गा मुर्ती मंडळाचे झरी खदान येथे विसर्जन

नवीन नांदेड - मनपा प्रशासनाचा वतीने सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ दुर्गा देवी मुर्तीचे नांदेड शहर सह ग्रामीण भागातील सिडको हडको भागातील विसर्जन झरी खदान येथे ३ व ४ ऑक्टोबर रोजी जेसीबी क्रेनचा सहायाने करण्यात आले यावेळी पोलीस व मनपा अधिकारी कर्मचारी यांच्यी नियुक्ती करण्यात आली होती.

मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे , अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे व जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने झरी खदान या ठिकाणी विसर्जन करण्यासाठी क्रेन ,विधुत व्यवस्था,तराफे,जिवरक्षक दल यासह अन्य सुविधा दुर्गा देवी



महोत्सव पदाधिकारी यांच्या साठी राबविण्यात आली तर मनपाचे बांधकाम विभागाच्ये अभियंता दिलीप टाकळीकर,उप अभियंता अरूण शिंदे, सहाय्यक अभियंता किरण सुर्यवंशी यांच्या सह पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार व होमगार्ड यांच्यी नियुक्ती करण्यात आली होती, विसर्जन मार्गावर विघुत व्यवस्था यासह रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले होते. सिडको क्षेत्रीय कार्यालयचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग ,सहाय्यक आयुक्त गणेश कावडे,यांच्या सह कार्यालय अधीक्षक विलास गजभारे,कर निरीक्षक शेख शादुला,संजय नागापूरकर, मारोती सारग, बालाजी कल्याणकर, यांच्या सह वसुली लिपीक मालु एनफळे ,प्रकाश दर्शने ,नथुराम चवरे, रविंद्र पवळे,सुधीर कांबळे,राहुल पाईकराव, रमेश यशवंतकर, बालाजी लोहगावकर, मदन बैस ,कोल्हे, विठ्ठल अंबटवार ,यांच्या सह कार्यालयीन कर्मचारी व स्वच्छता विभाग उपायुक्त गुलाम सादेक, स्वच्छता विभाग प्रमुख वसिम तडवी, निरीक्षक रूपेश सरोदे,किशन वाघमारे, साफसफाई कर्मचारी नियुक्ती करण्यात आली होती तर जिवरक्षक दलाच्या साह्याने मुर्ती विसर्जन करण्यात आले.रात्री उशीरापर्यंत विसर्जन चालुच होते.